नोव्हेंबर – डिसेंबर २०१९ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य















**एकच ध्येय महाराष्ट्र धर्म!**



# पहावा विठ्ठल

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा देताना वारकरी दाम्पत्य.

# अंतरंग



## हीच ती वेळ... ६

अनेक ऐतिहासिक क्षणांचा साक्षीदार असलेल्या शिवाजी पार्क मैदानाच्या इतिहासात २८ नोव्हेंबरची संध्याकाळ एक विशेष संध्याकाळ म्हणून गौरवली जाईल. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि श्री. उद्धव ठाकरे यांच्या प्रचंड गर्दीच्या सभांनी गजबजून जाणाऱ्या या मैदानात जेव्हा श्री. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, त्या वेळी संपूर्ण मैदान रोमांचित झाले.



## लोकनायक १०

सामाजिक कामांच्या माध्यमातून शिवसेनेला 'गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये पोहोचवण्याचे काम उद्धव ठाकरे यांनी केले. त्यामुळेच शिवसेनाप्रमुख जसे 'लोकमान्य' बनले तसेच उद्धव ठाकरे हेही आपल्या कामातून 'लोकनायक' बनले आहेत.

## ज्ञानसूर्य ३६

जगात काही थोर विभूतींचे ग्रंथप्रेम प्रसिद्ध आहे. 'अखेरच्या क्षणी कपाटातील ग्रंथांचा वियोग होणार' म्हणून वॉल्टर स्कॉट ढसढसा रडला होता. त्याच परंपरेत 'ग्रंथांमुळे जीवनाला अर्थ येतो' असे सांगणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरसुद्धा होते.

## नव्या महाराष्ट्राचा रोडमॅप १७

राज्याच्या विकासात शेतकरी, सर्वसामान्य कष्टकरी जनता केंद्रस्थानी ठेवून स्वच्छ, पारदर्शक आणि निर्णयाभिमुख प्रशासन देणे, राज्याची आर्थिक स्थिती जनतेसमोर मांडतानाच ती सुधारण्यावर भर देणे हाच नव्या शासनाचा रोडमॅप आहे.

## आपले लोकप्रतिनिधी १८-३५

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ मध्ये २८८ विधानसभा मतदार संघातील विजयी उमेदवार.

## सतनाम ५०

गुरू नानकांचा उल्लेख करताना शीख बांधव तो अतिशय आदराने श्री गुरू नानक देवजी असा करतात. गुरू नानकजी यांना समजून घेण्याचा प्रयत्न विद्वान व इतिहासकार सतत करत आले आहेत. गुरू नानक यांचा मार्ग हा थेट परमेश्वर भेटीचा मार्ग आहे.



## 'लंडन'मध्ये महाराष्ट्र ५२

लंडन येथे झालेल्या 'वर्ल्ड ट्रॅव्हल मार्केट' प्रदर्शनामध्ये सहभागी होत महाराष्ट्राच्या पर्यटन विभागाने राज्यातील विविध पर्यटन संधींची माहिती जगभरातील पर्यटन व्यावसायिकांना उपलब्ध करून दिली. विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न यातून करण्यात आला.


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हीच ती वेळ... | ६ | नव्या महाराष्ट्राचा रोडमॅप | १७ | महापरिनिर्वाण दिन | |
| आपले मुख्यमंत्री | ९ | आपले लोकप्रतिनिधी | १८-३५ | असा पाळा... | ४९ |
| लोकनायक | १० | ज्ञानसूर्य | ३६ | सतनाम | ५० |
| पहिला निर्णय | | निष्णात | ३९ | 'लंडन'मध्ये महाराष्ट्र | ५२ |
| छत्रपतींच्या रायगडासाठी... | १३ | बाबासाहेबांची अस्थिस्थळे | ४२ | सन्मान महाराष्ट्राचा | ५४ |
| आपले नवे मंत्री | १४ | 'मूकनायक'ची शताब्दी | ४६ | हवामानबदलाची दिशा | ५६ |

वर्ष ७१ वे | अंक ५ – ६ | नोव्हेंबर – डिसेंबर २०१९

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — अनिल आलूरकर
- सहसंपादक — किर्ती पांडे, मनीषा पिंगळे
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण साहाय्य — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ९३७२२३०३२०
(सकाळी १०.३० ते ५.३० कार्यालयीन कामकाजा दिवशी)

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.




**जनतेने** शासनावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी आणि महाराष्ट्राला देशात अग्रेसर करण्यासाठी विकासकामे करताना जनतेचा एकही पैसा वाया जाणार नाही याकडे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कटाक्षाने लक्ष द्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत.

मुख्यमंत्री कार्यालयात पदभार स्वीकारल्यानंतर प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.

'जनतेने दिलेल्या करातून विकासकामांसाठी निधी प्राप्त होत असतो.

# जनतेचा एकही पैसा वाया जाणार नाही : मुख्यमंत्री

निधीचा योग्य प्रकारे विनियोग करून विकासाला गती देणे आवश्यक आहे. सेवाभावनेने कामे केल्यास जनतेचा विश्वास संपादन करता येईल. हे सरकार माझे आहे, अशी विश्वासाची भावना जनतेच्या मनात निर्माण करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. जनतेने विश्वासाने मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी आपल्यावर सोपवली आहे. राज्याला मुंबईत जन्मलेला पहिला मुख्यमंत्री मिळाला असल्याने मुंबईसह राज्याला देशात अग्रेसर करण्याचे स्वप्न घेऊन यापुढे काम करावयाचे आहे. विकासकामांसाठी निधी देताना करदात्याचे उत्पन्न वाढेल याकडेदेखील लक्ष देणे तेवढेच महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण आणण्यासाठी विकासकामांचा प्राधान्यक्रम ठरवणे आवश्यक आहे.

जनसेवेसाठी पारदर्शक आणि स्वच्छ कारभारावर अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे. शासन आणि प्रशासनाबद्दल जनतेच्या मनात आपुलकीची आणि आदराची भावना निर्माण होण्यासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्वांगीण विकास साधताना कामांची गती आणि दिशेलाही तेवढेच महत्त्व आहे. त्या दृष्टीने प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी खूप महत्त्वाची आहे. अधिकारी आपल्या जबाबदारीचे सक्षमपणे निर्वहन करतील आणि प्रगतीचे उद्दिष्ट गाठण्यास शासन यशस्वी होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# संयत आणि समर्थ



**एकनाथ शिंदे**
मा.मंत्री

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी गुरुवार २८ नोव्हेंबर २०१९ रोजी शिवाजी पार्क येथील शिवतीर्थावर महाराष्ट्राचे २९ वे मुख्यमंत्री म्हणून, प्रचंड संख्येने जमलेल्या जनसमुदायासमोर शपथ घेतली आणि महाराष्ट्रात नव्या पर्वाचा प्रारंभ झाला.

महाराष्ट्र हे देशातील एक समर्थ आणि संपन्न असे राज्य आहे. या राज्याला एका नव्या उंचीवर नेण्यासाठी मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सज्ज झाला आहे.

महाराष्ट्राला सध्या अनेक समस्यांनी ग्रासले आहे. विशेषत: अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांना अत्यंत भरीव आणि मोठी अशी मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी आपल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी २० कोटी रुपये मंजूर करून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा केला आहे.

हे सरकार ‘आमचं सरकार’ असल्याचा विश्वास सर्वसामान्यांना वाटला पाहिजे. त्या अनुषंगाने, त्यांच्या हिताचे व जिव्हाळ्याचे निर्णय तत्काळ घेतले जावेत, असे निर्देश श्री. ठाकरे यांनी प्रशासनाला दिले आहेत. जनतेच्या प्रत्येक पैशाचा विनियोग हा काटेकोरपणे व्हायला हवा, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

श्री. ठाकरे यांच्या रूपाने महाराष्ट्राला संयमी परंतु ठाम, मृदू परंतु निश्चयी आणि प्रेमळ परंतु कर्तव्यकठोर असे लखलखीत नेतृत्व लाभले आहे. या नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली शिवछत्रपतींचा महाराष्ट्र नव्या तेजाने तळपू लागेल यात शंका नाही.

६ डिसेंबर महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश जगातील सर्वश्रेष्ठ अशा विचारवंत आणि सामाजिक क्रांती घडवून आणणाऱ्या प्रमुख नेत्यांमध्ये होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील उपेक्षितांना केवळ जगण्याची शक्ती दिली नाही तर त्यांना आत्मभानही दिले. या आत्मभानातून उपेक्षित-वंचितांना आत्मविश्वास प्राप्त झाला. जगण्याची नवी ऊर्मी, नवी ऊर्जा प्राप्त झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेली सामाजिक क्रांती अद्वितीय आणि अद्‌भुत अशी आहे. ही क्रांती घडवून आणण्यासाठी त्यांना अखंड परिश्रम करावे लागले. उपेक्षितांचे जीवन त्यांच्या वाटेला आले होते. पण या परिस्थितीवर मात करण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती त्यांच्याकडे होती. हे करताना त्यांनी संपूर्ण उपेक्षित व वंचित समाजाच्या सर्वांगीण उत्थानाचा हिमालय उचलण्याचा निर्धार आणि निश्चय केला. आपली प्रकांड बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टी यांचा समन्वय साधून त्यांनी सामाजिक क्रांतीचा नवा अध्याय लिहिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत खडतर परिस्थितीत आपले प्रारंभीचे व नंतरचे परदेशातील उच्च शिक्षण पूर्ण केले. या शिक्षणानंतरही त्यांचा ज्ञानयज्ञ अखंड सुरू राहिला. अर्थकारण, समाजकारण, कामगार, कायदे, जलसंधारण, धर्मशास्त्र, संरक्षण अशा अनेक विषयांत त्यांना गती होती. या विषयांवरचे शेकडो ग्रंथ त्यांच्या संग्रही होते. ग्रंथांवरचे त्यांचे प्रेम हे केवळ अवर्णनीय आहे. स्वत:च्या घरी स्वतंत्र दालन उभारून या ग्रंथसंपदेची जोपासना त्यांनी ममतेने केली.



भारताची घटना तयार करताना त्यांनी आपल्या देशाची एकता, अखंडता, एकात्मता, धर्मनिरपेक्षता या बाबींसाठी केलेले विवेचन व भाष्य तसेच त्या अनुषंगाने अंतर्भूत केलेल्या बाबी अत्यंत महत्त्वाच्या व कालजयी ठरल्या आहेत. यामुळे भारताची घटना जगातील सर्वश्रेष्ठ घटनांपैकी एक ठरली आहे. या घटनेने सर्वसामान्य लोकांना दिलेल्या शक्तीचे प्रदर्शन वेळोवेळी मतपेटीतून होताना दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समाजातील सर्वच घटकांतील महिलांवरील शतकानुशतके होणारा अन्याय दूर करण्यासाठी भारतीय घटनेच्या माध्यमातून केलेले प्रयत्न दूरगामी ठरले आहेत. भारतीय महिलांना अस्मिता, न्याय आणि दर्जा मिळवून देण्याचे बाबासाहेबांचे हे कार्य अजोड असे आहे.

६ डिसेंबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले. पण त्यांचे कार्य, विचार त्यांनी दिलेली दिशा, प्रेरणा, ऊर्जा आणि आत्मसन्मानाचा हुंकार हे सर्व चिरंतन राहणार आहे. या महामानवाच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ‘लोकराज्य’ परिवारातर्फे त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन!

महापरिनिर्वाण दिनानिमित्त आम्ही ‘लोकराज्य’मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या पैलूंवर आधारित काही लेखांचा समावेश केला आहे.

हा अंक आपणास आवडेल, अशी खात्री आहे.

**एकनाथ शिंदे**
(अतिथी संपादक)

# हीच ती वेळ...





**अनेक ऐतिहासिक क्षणांचा साक्षीदार असलेल्या शिवाजी पार्क मैदानाच्या इतिहासात २८ नोव्हेंबरची संध्याकाळ एक विशेष संध्याकाळ म्हणून गौरवली जाईल. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि श्री. उद्धव ठाकरे यांच्या प्रचंड गर्दीच्या सभांनी गजबजून जाणाऱ्या या मैदानात जेव्हा श्री. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, त्या वेळी संपूर्ण मैदान रोमांचित झाले.**

संध्याकाळचे ६.४० झालेले. सकाळपासून ज्या क्षणाची वाट पाहत होतो तो क्षण समोर होता. महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी यांनी 'मी' म्हणताच शिवाजी पार्कवरील लाखो लोकांची नजर श्री. उद्धव ठाकरे यांच्यावर खिळली... 'छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करून आणि आईवडिलांना स्मरून मी उद्धव बाळासाहेब ठाकरे ईश्वर साक्ष शपथ घेतो की, असे म्हणताच...' शिवाजी पार्कवर एकच जल्लोष झाला. महाराष्ट्राला २९वे मुख्यमंत्री मिळाले होते आणि समोर उपस्थित जनतेच्या चेहऱ्यावरून 'हीच ती वेळ' ज्यासाठी आपण शिवाजी पार्कवर जमलो होतो अशी भावना ओघळत होती.

अनेक ऐतिहासिक क्षणांचा साक्षीदार असलेल्या शिवाजी पार्क मैदानाच्या इतिहासात २८ नोव्हेंबरची संध्याकाळ एक विशेष संध्याकाळ म्हणून गौरवली जाईल. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि श्री. उद्धव ठाकरे यांच्या प्रचंड गर्दीच्या सभांनी गजबजून जाणाऱ्या या मैदानात जेव्हा श्री. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली त्या वेळी संपूर्ण मैदान रोमांचित झाले. राज्याच्या कानाकोपऱ्यांतून आलेल्या शेतकरी, कष्टकरी, युवकांच्या मुखावर आता आपला नेता राज्याचा प्रमुख बनला आहे ही अभिमानाची आणि गौरवाची भावना चमकत होती.



मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना श्री. उद्धव ठाकरे

संध्याकाळी शपथविधी होणार आहे हे सर्वांनाच ठाऊक होते तरीही सकाळपासूनच मैदानात लोकांची रीघ लागली होती. या शपथविधी सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी वाड्या-वस्त्यांवरून लोक मिळेल त्या वाहनाने आले होते. काहींची रात्रभर झोपही झाली नव्हती पण तरीही त्यांच्या चेहऱ्यावर आणि डोळ्यांत एक अपूर्व आनंद पाझरत होता. या शपथविधी सोहळ्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण राज्यातून वेगवेगळ्या स्तरांतून लोक आले होते. शेतकरी, कामगार, कष्टकरी, युवक, महिला याबरोबरच हिंदी-मराठी चित्रपट आणि नाट्यक्षेत्रातील कलावंत उपस्थित होते. सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातून वारकरीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

शपथविधी सोहळा संध्याकाळी असला तरी शिवाजी पार्कवर राज्यातील जनतेची सकाळपासूनच हळूहळू गर्दी होत होती. राज्यातीलच नव्हे तर देशभरातील अनेक वृत्तपत्रांचे पत्रकार आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाचे माध्यम प्रतिनिधी मैदानावरील प्रत्येक क्षण टिपण्यास सज्ज होता. खुर्च्यांची मांडामांड, फुलांच्या सजावटीपासून ते शपथविधीला प्रत्यक्षात कोण कोण येणार याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती. व्यासपीठावरून नंदेश उमप यांचा कार्यक्रम सुरू होता. पोवाडे आणि समरगीतांच्या माध्यमातून ते वातावरण अधिक उत्साहित, प्रफुल्लित करत होते, वातावरणात जल्लोष पेरला जात होता. प्रतीक्षा, उत्सुकता, थोडा ताण आणि भारावलेपण अशा अनेक छटांचे भाव येथील सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

राज्याच्या राजकारणात गेल्या पाच दशकात आपला वेगळा ठसा उमटवणाऱ्या ठाकरे घराण्यातील पहिलाच सदस्य राज्याचा प्रमुख म्हणून शपथ घेणार असल्याने त्याबाबत माध्यमांतही प्रचंड उत्सुकता होती. राज्यातील बहुतेक मराठी वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी थेट प्रक्षेपण मैदानातून करत होते तर हिंदी आणि इंग्रजी माध्यमांचे प्रतिनिधी यातून प्रेक्षकांसाठी वेगवेगळ्या रंजक स्टोरीज करण्यात मग्न होते. महाराष्ट्राच्या नव्या शासनाच्या शपथविधीच्या सोहळ्याचे वार्तांकन करण्यासाठी मल्याळम, तमिळ, तेलुगू, कन्नड अशा विविध भारतीय भाषांतील प्रतिनिधीही आवर्जून उपस्थित होते. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या माध्यमप्रतिनिधींमध्येही उत्सुकता होती. महाराष्ट्रासारख्या विविध क्षेत्रात आघाडीवर असलेल्या राज्याचे प्रमुखपद एक संयमी आणि विचारांवर दृढ असलेल्या नेत्याकडे जात असताना त्याबाबतची उत्सुकता ताणली जात होती. ६.३६ मिनिटांनी श्री. ठाकरे यांचे व्यासपीठावर आगमन झाले आणि उपस्थितांनी जल्लोष केला. केशरी रंगाचा कुर्ता आणि चेहऱ्यावर आत्मविश्वास, डोळ्यात समोरच्या उपस्थित जनतेबद्दलचे आभाराचे भाव होते. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी समोर उपस्थित जनतेला नमन करून हे राज्य तुमचे आहे, तुमच्यासाठीच चालवले जाईल असा एक कृतज्ञ संदेशच दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जनकल्याणाच्या विचारांनीच हे शासन चालेल हे त्यांनी शपथविधीपूर्वीच त्यांचे स्मरण करून जनतेला आश्वासित केले.

श्री. ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाची आणि गोपनीयतेची शपथ घेतल्यानंतर सर्वश्री एकनाथ शिंदे, सुभाष देसाई, जयंत पाटील, छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात आणि नितीन राऊत यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. शपथविधीच्या या सोहळ्याला राज्य आणि देश पातळीवरचे दिग्गज नेते उपस्थित होते.

**प्रवीण कुलकर्णी**

# आपले मुख्यमंत्री

महाराष्ट्राचे २९ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतलेले श्री. उद्धव ठाकरे हे शिवसेनेचे पक्षप्रमुखही आहेत. गेल्या अनेक दशकांपासून मराठी माणूस, शेतकरी, कष्टकरी जनतेच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या श्री. ठाकरे यांना त्यांचे वडील शिवसेनेचे संस्थापक हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, आई स्व.मीनाताई आणि आजोबा प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांचा समृद्ध वारसा लाभला आहे.

शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी पायाभरणी केलेल्या आणि शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या दैनिक 'सामना'ची धुरा श्री. ठाकरे यांनी मुख्य संपादक म्हणून सांभाळली.

२७ जुलै १९६० रोजी मुंबईमध्ये जन्म झालेले श्री. उद्धव ठाकरे जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्‌सचे स्नातक असून त्यांच्या छायाचित्रांची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. एक सिद्धहस्त लेखक आणि व्यावसायिक छायाचित्रकार असलेल्या श्री. ठाकरे यांच्या कलाकृतींची दखल अनेक नामवंत मासिकांनी वेळोवेळी घेतली आहे. तसेच त्यांच्यातील जागतिक दर्जाच्या छायाचित्रकाराचे दर्शन विविध प्रदर्शनांच्या माध्यमातून रसिकांना घडले आहे.

## राजकीय कारकिर्द

श्री. उद्धव ठाकरे यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात विद्यार्थिदशेपासून झाली. शिवसेनेच्या माध्यमातून सामाजिक आणि राजकीय जीवनात सक्रिय असलेल्या श्री. ठाकरे यांच्याकडे २००२ च्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीची जबाबदारी आली आणि महापालिकेवर शिवसेनेची सत्ता स्थापन करीत त्यांनी ती यशस्वीरीत्या पूर्ण केली. या निवडणुकीने त्यांच्यातील राजकीय नेतृत्वगुण संपूर्ण राज्याने अनुभवले. २००३ मध्ये पक्षाने त्यांच्याकडे कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. २००४ मध्ये त्यांना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आपला उत्तराधिकारी म्हणून घोषित केले.

## व्यक्तिगत जीवन

श्री.उद्धव ठाकरे यांचा विवाह सौ. रश्मी यांच्याशी झाला असून त्यांना आदित्य आणि तेजस अशी दोन मुले आहेत. श्री. आदित्य ठाकरे आजोबा आणि वडिलांचा राजकारणाचा वसा पुढे चालवत आहेत. ते सध्या युवा सेनाप्रमुख असून वरळी विधानसभा मतदारसंघातून निवडून आले.

## कलात्मक पैलू

महाराष्ट्राच्या भौगोलिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक अशा अलौकिक सौंदर्याचे मूर्तिमंत आणि विहंगम छायाचित्रण त्यांच्या 'महाराष्ट्र देशा' या २०१० ला प्रकाशित झालेल्या पुस्तकातून दिसून येते. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिकतेचा मानबिंदू असलेल्या 'पंढरपूर वारी'चे आणि ग्रामीण महाराष्ट्राचे यथार्थ छायाचित्रण त्यांच्या 'पहावा विठ्ठल' या २०११ मधील पुस्तकांच्या माध्यमातून देशालाच नव्हे तर जगाला भुरळ घातली. आपल्या छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून दुष्काळी भागातील शेतकरी आणि वन्यजीव संरक्षणासाठी निधी उभारून त्यांनी मदत केली.

## योगदान

शिवसेनेच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर शिवसेनेला अधिक सर्वसमावेशक करतानाच आधुनिकतेशी त्यांनी शिवसेनेला जोडले. युवक, कामगार आणि शेतकरी यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी राज्यभर चालवलेल्या विविध आंदोलनांना यश आले. ■ ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या धोरणाने कार्य करणाऱ्या शिवसेनेच्या समाजकारणाची दखल गिनीज बूकने घेतली आहे. ■ श्री. ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने मलेरिया आजारासाठी चाचणी आणि उपचार केंद्र सुरू करून गरजूंसाठी औषध पुरवठाही सुरू केला. ■ मुंबईमधील आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने अनेक रुग्णालयांचे निर्माण. ■ विविध रक्तदान महाशिबिरांच्या



माध्यमातून नावीन्यपूर्ण समाजकार्याची पायाभरणी. ■ २००२ च्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे प्रचारप्रमुख म्हणून जबाबदारी आणि विजयाचे शिल्पकार. महाराष्ट्रात पक्षविस्तार केल्याने लोकसभा, विधानसभा निवडणुकांमध्ये शिवसेनेला यश. ■ गेल्या पाच वर्षांपासून राज्यातील आणि केंद्रातील सरकारांमध्ये शिवसेना एक प्रमुख घटकपक्ष म्हणून सहभागी. ■ राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाला भरघोस यश. ■ श्री. उद्धव ठाकरे यांनी २००७ मध्ये विदर्भातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी यशस्वी मोहीम राबवली. ■ श्री. उद्धव ठाकरे यांनी शेतकरी कल्याणावर लक्ष केंद्रित करीत आपल्या पक्षाचा विस्तार वाढवला आणि राज्यानेही त्यांचे नेतृत्व स्वीकारले. ■ संवेदनशील लेखक आणि छायाचित्रकार असलेल्या श्री. उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या राजकारणामध्ये महत्त्वाचे बदल घडवून आणले आणि पक्षाला आजचे सुसंघटित रूप दिले. महाराष्ट्राला विविध आघाड्यांवर पुढे घेऊन जाणारे नेतृत्व श्री. उद्धव ठाकरे यांच्या रूपाने लाभले आहे. ■■

# लोकनायक





मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर जनसमुदायाला अभिवादन करताना श्री. उद्धव ठाकरे.

**सामाजिक कामांच्या माध्यमातून शिवसेनेला 'गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये पोहोचवण्याचे काम उद्धव ठाकरे यांनी केले. त्यामुळेच शिवसेनाप्रमुख जसे 'लोकमान्य' बनले तसेच उद्धव ठाकरे हेही आपल्या कामातून 'लोकनायक' बनले आहेत.**




**हर्षल प्रधान**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविषयी पक्षाबाहेर अनेक मतमतांतरे आहेत. शिवसेनाप्रमुखांचा वारसा ते समर्थपणे चालवू शकतील का, असाही प्रश्न यापूर्वी अनेकदा उपस्थित करण्यात आला होता. बाळासाहेबांचा आक्रमक स्वभाव, त्यांचे आक्रमक भाषण करून विरोधकांना नामोहरम करून टाकण्याची शैली, या गोष्टी उद्धव ठाकरे यांच्याकडे नाहीत असे मानणारा एक वर्ग आहे. स्वत: उद्धव ठाकरे हेही आपण शिवसेनाप्रमुखांसारखे भाषण करू शकत नाही हे मान्य करतात. बाळासाहेबांसारखे व्यक्तिमत्त्व हे शतकातून एखाद्या वेळीच जन्माला येते त्यामुळे त्यांच्यासारखे दुसरे कोणी असूच शकत नाही, असे स्पष्टपणे ते सांगतात. मग उद्धव ठाकरे यांच्यामध्ये असे नेमके काय आहे की, त्यांनाही सर्वसामान्य शिवसैनिक आपला नेता मानतो. त्यांच्यावर सर्वांचा विश्वास का आहे, सौम्य व्यक्तिमत्त्व असूनही त्यांच्याविषयी शिवसेनेत आदरयुक्त भीती का निर्माण झाली आहे या आणि अशासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे खरे तर खूप सोपी आहेत.

### ठाम भूमिका

सौम्य असले तरी ते आपल्या भूमिकेवर अत्यंत ठाम असतात. दिलेल्या शब्दाला ते जागतात. उगाच नेत्याची झूल पांघरून न



**मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे, सौ. रश्मी ठाकरे आणि आमदार श्री. आदित्य ठाकरे व श्री. तेजस ठाकरे.**

बसता अथवा बडेजाव न करता थेट कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधतात. विशेष म्हणजे खोटेपणाची व चमचेगिरीची चीड असलेले उद्धव ठाकरे हे जनसामान्यांची कामे करण्याला प्राधान्य देतात. सत्ता हे केवळ साध्य नसून लोकांची कामे करण्याचे साधन आहे असे श्री. ठाकरे यांचे मत आहे. त्यामुळेच बाळासाहेबांच्या तालमीत तयार झालेल्या शिवसैनिकांनाही ते आपलेसे वाटतात. राजकारणापेक्षा समाजकारणात रमणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे.

मुंबई महापालिकेची सत्ता त्यांच्या नेतृत्वाखाली मिळाल्यानंतर पावसाळ्यात मुंबईतील खड्डे हा चर्चेचा विषय बनला तेव्हा ते स्वतः खड्डे बुजवण्याच्या कामात सक्रिय झाले. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो की, मुंबईच्या आरोग्याच्या समस्या असो त्या सोडवण्यासाठी जीवाचे रान करण्याची त्यांची तयारी असते. यंदाही पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडले तेव्हा रात्री तीन तीन वाजेपर्यंत खड्डे बुजवण्याच्या कामावर त्यांनी जातीने लक्ष ठेवले होते. मलेरियाची समस्या उद्‌भवताच पालिका प्रशासनाच्या बैठका घेतल्या. स्वत: सर्व रुग्णालयांमध्ये फिरून उपचाराची व्यवस्था तपासून पाहिली. पक्षाच्यावतीने मलेरिया तपासणी व उपचार केंद्रे सुरू केली. ३० लाख रुपयांच्या औषधांचे वाटप केले. मुंबईची त्यातही उपनगरातील आरोग्यसेवा बळकट करण्यासाठी योजना आखल्या. यातून आगामी काळात बोरिवली येथे भगवती, कांदिवली येथे शताब्दी, विलेपार्ले येथील कूपर तसेच जोगेश्वरी येथे रुग्णालये उभी राहिली आहेत वा उभी राहत आहेत. ही रुग्णालये उपनगरातील ६३ लाख लोकांसाठी काळाची गरज आहे.

## सामाजिक कामाविषयी दृढ निष्ठा

लोकांसाठी आणि विकासासाठी सत्ता राबवण्याचे स्वप्न पाहणारे व ते प्रत्यक्षात आणण्यासाठी राबणारे श्री. उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व आगळेवेगळे म्हणावे लागेल. २५ एप्रिल २०१० ला एनएसई संकुलात 'रक्तदानाचा महायज्ञ' आयोजित करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी एका अलौकिक सामाजिक कार्याचे शिवधनुष्य उचलले आणि पाहता पाहता या महायज्ञाने शिवसेनेची नोंद गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली.

श्री. ठाकरे यांच्याकडे प्रखर सामाजिक बांधिलकी असल्यामुळेच अशक्य वाटणार हे विश्वविक्रमी सामाजिक कार्य सहज होऊन गेले. त्यांच्याकडे सामाजिक कामाविषयी दृढ निष्ठा व विचारांची बैठक असल्यामुळेच रक्तदानाचा महायज्ञ होऊ शकला.

आजच्या राजकीय प्रवासात प्रसारमाध्यमांच्या मदतीने सहज मोठे होता येणे शक्य असतानाही, ही झटपट मोठे होण्याची वाट उद्धव यांनी आजपर्यंतच्या राजकीय वाटचालीत चोखाळली नाही. ठाकरे घराण्यातील पूर्वसूरींचे सामाजिक कार्य आणि शिवसेनाप्रमुखांच्या सामाजिक बांधिलकीचा वारसा घेऊन राजकारणात प्रवेश केलेल्या उद्धव ठाकरे यांनी कामातून लोकांना जिंकण्याचा मार्ग स्वीकारला आहे. ही वाटचाल सोपी नाही. अत्यंत खडतर वाटचाल असून या वाटेवर श्रेयापेक्षा टीकेचे धनीच जास्त वेळा व्हावे लागते. पक्षाच्या कामकाजात लक्ष घालण्यास श्री. ठाकरे यांनी ज्या सुमारास लक्ष घातले त्या वेळी परिस्थिती लक्षात घेऊन तळापासून बांधणी करण्यास सुरुवात केली. गटप्रमुखांच्या नेमणुकांमध्ये त्यांनी लक्ष घातले. पुढे उपशाखाप्रमुख, शाखाप्रमुख पदांच्या नियुक्त्या सुरू झाल्या तेव्हा प्रस्थापितांनी आपल्या विभागांना हात लागणार नाही याची काळजी घेण्यास सुरुवात केली.

मुरब्बी राजकारण्याप्रमाणे श्री. ठाकरे संघटनाबांधणीकडे लक्ष देत होते. नगरसेवकांपासून आमदारांपर्यंताची उमेदवारी ही संघटनेकडून म्हणजेच शाखाप्रमुख ते विभागप्रमुखांच्या माध्यमातूनच ठरेल अशी भूमिका घेत, संघटनेला व पदाधिकाऱ्यांना त्यांनी महत्त्व दिले. प्रत्येक शिवसैनिक मोठा असल्याचे श्री. ठाकरे यांनी कृतीतून दाखवून दिले.

## महाराष्ट्र काढला पिंजून

श्री. ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई-ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत विजय मिळाला आणि त्यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाले. कोणाच्याही टीकेला प्रत्युत्तर न देता उद्धव यांनी संघटना बांधणीवर आणि राज्यातील जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून काम सुरूच ठेवले. निवडणुकीनिमित्त श्री. ठाकरे यांनी महाराष्ट्र पिंजून काढला. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपासून ग्रामीण भागातील अनेक विषय त्यांनी लावून धरले. प्रसंगी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी स्वतः काढलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरवून त्या विक्रीतून आलेली सुमारे १० लाख रुपयांची रक्कम शेतकऱ्यांसाठी देऊन आपण एक वेगळा संवेदनशील राजकारणी असल्याचे दाखवून दिले.

श्री. ठाकरे शिवसैनिकांच्या गळ्यातले ताईत आणि महाराष्ट्रातील सर्वसमान्यांचे लोकनायक झाले ते त्यांच्या याच संवेदनशील स्वभावामुळे आणि धोरणात्मक संयमी राजकीय पाऊलखुणांमुळे !!!



# पहिला निर्णय छत्रपतींच्या रायगडासाठी...



### रायगड संवर्धनासाठी २० कोटी रुपये

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर पहिला निर्णय घेतला तो रायगड संवर्धन आणि परिसर विकासासाठी २० कोटी रुपये निधी वितरणाचा. रायगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी ६०६ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार आहे. या आराखड्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय प्रलंबित होता. श्री. ठाकरे यांनी रायगड किल्ल्याच्या विकासकामांची नस्ती मागवली. विशेष बाब म्हणून निधी वितरणाच्या प्रस्तावास मान्यता देऊन त्यासंदर्भातील नस्तीवर पहिली स्वाक्षरी केली. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले हा राज्याचा समृद्ध वारसा असून त्याचे जतन करणे व पुढच्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी संवर्धन करणे आवश्यक असून राज्य शासन त्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य करील, असे श्री.ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे.

### आरे कारशेडच्या कामांना स्थगिती; आढाव्यानंतर पुढील निर्णय

'राज्यातील पायाभूत विकासाकडे विशेष लक्ष पुरवण्यात येईल. त्याबरोबरच पर्यावरण रक्षणाकडेही लक्ष देण्यात येईल. राज्य शासनाचा कोणत्याही विकास कामांना विरोध नाही. मात्र, वैभव गमावून विकास कामे होणार नाहीत. मुंबईतील मेट्रो प्रकल्पाचे काम गतीने करताना निसर्गाची हानी होणार नाही याकडे विशेष लक्ष दिले जाईल. त्यामुळेच आरेमधील मेट्रोच्या कारशेडच्या कामाला स्थगिती दिली असून या कामाचा पूर्णपणे आढावा घेऊन पुढील निर्णय घेतला जाईल. पुढील निर्णय होईपर्यंत वृक्षतोडीस स्थगिती दिली आहे.'

हे आपल्या सगळ्यांचे सरकार आहे. जनतेच्या पैशातून विविध योजनांवर खर्च केला जातो. त्यामुळे योजनांवर खर्च करताना हा करदात्याचा पैसा आहे, हे लक्षात ठेवून उधळपट्टी होणार नाही, याकडे लक्ष देण्याच्या सूचना विविध विभागाच्या सचिवांना देण्यात आल्या आहेत. मी मुंबईत जन्मलेला पहिलाच मुख्यमंत्री असल्यामुळे मुंबईसाठी काय करता येईल, याचा विचार सुरू आहे. मात्र, त्याबरोबरच राज्यातील इतर शहरांसाठीही कोणत्या गोष्टी करायच्या याबद्दलही विचार करत आहे. शेतकऱ्यांसाठीही लवकरच महत्त्वपूर्ण निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना स्पष्ट केले.

# आपले नवे मंत्री

## श्री. एकनाथ संभाजी शिंदे

**जन्म** : ६ मार्च, १९६४
**जन्म ठिकाण** : दरेगांव, तालुका जावळी, जिल्हा सातारा.
**शिक्षण** : एच.एस.सी.
**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी
**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती लता
**अपत्ये** : एकूण १ (एक मुलगा)



**व्यवसाय** : उद्योग/सामाजिक कार्य
**पक्ष** : शिवसेना
**मतदारसंघ** : १४७-कोपरी-पाचपाखाडी, जिल्हा ठाणे
**इतर माहिती** : संपूर्ण ठाणे शहर व जिल्ह्यात सामाजिक कार्याचे जाळे निर्माण केले; ठाणे शहरात ओपन आर्ट गॅलरी, सचिन तेंडुलकर मिनी स्टेडिअम, इंटरसिटी सुविधा भूखंडावर बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक, शहीद हेमंत करकरे क्रीडा संकुल, जॉगिंग पार्क, सेंट्रल लायब्ररी सुरू केली; आदिवासी प्रभाग मोखाडा, तलासरी व जव्हार येथील आश्रमशाळेत व आरोग्य केंद्रात सकस आहार व आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करून रूग्णांना विनामूल्य औषध वाटप केले; पालघर, बोईसर व सफाळे परिसरात शिवसेनेतर्फे एस.एस.सी विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन; गरीब विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप; पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप; वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन; अध्यक्ष, ठाणे जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन; उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स संघटना; पूरग्रस्तांना मदत; ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व आधुनिकीकरणासाठी विशेष योगदान; शिवसेना शाखा प्रमुख, वागळे इस्टेट, किसननगर नं.२, शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख; पक्षाच्या सर्व आंदोलनात सक्रिय सहभाग, दोन वेळा नगरसेवक, तीन वर्षे स्थायी समिती सदस्य, चार वर्षे सभागृह नेता, ठाणे महानगरपालिका; २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; डिसेंबर, २०१४ ते ऑक्टोबर २०१९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खात्याचे मंत्री, ऑक्टोबर २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड.

**(संदर्भ: १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)**

## श्री. सुभाष राजाराम देसाई

**जन्म** : १२ जुलै, १९४२
**जन्म ठिकाण** : मालगुंड, तालुका जिल्हा रत्नागिरी
**शिक्षण** : एस. एस. सी., पत्रकारिता पदविका
**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराती
**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सुषमा
**अपत्ये** : एकूण ३ (तीन मुलगे)



**व्यवसाय** : उद्योग
**पक्ष** : शिवसेना
**मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्य. द्वारा निर्वाचित
**इतर माहिती** : १९८२ संस्थापक, 'प्रबोधन गोरेगाव' विश्वस्त संस्था; १९७३ आंतरशालेय क्रीडा महोत्सव व आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन; १९७३ शिवसेना रुग्णवाहिका सेवा गोरेगाव येथे सुरू केली; १९७७ प्रमुख कार्यवाह, मुंबई उपनगर मराठी साहित्य संमेलन; १९८९ विश्वस्त, प्रबोधन प्रकाशन; प्रकाशक, 'दैनिक सामना', साप्ताहिक 'मार्मिक व 'दोपहार का सामना'; १९९१ प्रबोधन क्रीडा भवनाची उभारणी; १९९२ मुख्य संयोजक, कोकण रेल्वे परिषद, खेड, जिल्हा रत्नागिरी; १९९९ प्रबोधन जॉगर्स पार्कची उभारणी; २००० मुख्य संयोजक, मुंबई फेस्टिवल व हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत उत्सव; २००१ मुख्य संयोजक, 'हर्बलवल्ड' औषधी वनस्पतींचे प्रदर्शन व चर्चा सत्राचे आयोजन; २००२ मध्ये उल्लेखनीय सार्वजनिक कार्याबद्दल संभाजी प्रतिष्ठानतर्फे धर्मवीर पुरस्कार प्राप्त; २००३ सहारा विमानतळावर अश्वारूढ शिवप्रतिमेची स्थापना; २००४ प्रबोधन रक्तपेढी सुरू केली; १९६६ शिवसेनेच्या स्थापनेपासून शिवसैनिक म्हणून कार्य; १९८४ शिवसेना नेता; १९८५ प्रमुख संयोजक, शिवसेनेचे दुसरे महाराष्ट्रव्यापी अधिवेशन (महाड); १९८६-९० शिवसेना जळगाव जिल्हा संपर्क प्रमुख; १९८९ पासून सरचिटणीस, शिवसेना; १९९५ अध्यक्ष, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ; १९९० मध्ये विधानसभेवर निवड; २००४-०९, २००९-१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१५-१६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; ५ डिसेंबर, २०१४ ते २०१९ पर्यंत महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री; जुलै २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड.

**(संदर्भ : महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)**

## श्री. जयंत राजाराम पाटील

| | |
|---|---|
| **जन्म** | : १६ फेब्रुवारी १९६२ |
| **जन्म ठिकाण** | : सांगली. |
| **शिक्षण** | : बी. ई. (सिव्हिल) |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती शैलजा |
| **अपत्ये** | : एकूण २ (दोन मुलगे) |
| **व्यवसाय** | : शेती |
| **पक्ष** | : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. |
| **मतदारसंघ** | : २८३-इस्लामपूर ,जिल्हा-सांगली |




**इतर माहिती** : चेअरमन, राजारामबापू सहकारी साखर कारखाना लि; उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस; चेअरमन, कासेगाव शिक्षण संस्था; चेअरमन, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन; अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघ; संचालक, वसंतदादा शुगर इस्टिट्यूट, पुणे; सदस्य, अखिल भारतीय साखर संघ, संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, सहकारी बँका, पतसंस्था, सहकारी सूतगिरणी, सहकारी ग्राहक भांडार, शेती पदवीधर संघ; कुक्कुटपालन सह. सोसायटी इत्यादी संस्था स्थापना करून जनसामान्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी व भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अथक परिश्रम घेतले; सदस्य, कार्यकारी मंडळ शिवाजी विद्यापीठ, सांगली जिल्हा व्यसनमुक्ती समिती व राजाराम बापू ज्ञान प्रबोधनी; कौन्सिल मेंबर, इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक कॉलेज, राजाराम नगर; सर्व संस्थाचे काम संगणकाच्या माध्यमातून करण्यामध्ये अग्रेसर; मे १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; १९९०-९५, १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा ; नोव्हेंबर १९९९ ते डिसेंबर २००८ अर्थ व नियोजन खात्याचे मंत्री ; १९९९ पूर्वी विस्कटलेली राज्याची घडी योग्य मार्गावर आणण्यासाठी अर्थमंत्री म्हणून प्रदीर्घकाळ योगदान दिले; डिसेंबर २००८ मध्ये काही काळासाठी गृह खात्याचा कार्यभार; नोव्हेंबर २००९ ते ऑक्टोबर २०१४ ग्रामविकास खात्याचे मंत्री; प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**(संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)**

## श्री. छगन चंद्रकांत भुजबळ

| | |
|---|---|
| **जन्म** | : १५ ऑक्टोबर १९४७. |
| **जन्म ठिकाण** | : नाशिक. |
| **शिक्षण** | : एल.एम.ई.(आय). |
| **ज्ञात भाषा** | : मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : विवाहित, पत्नी श्रीमती मीना. |
| **अपत्ये** | : एकूण १ (एक मुलगा). |
| **व्यवसाय** | : शेती. |
| **पक्ष** | : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. |
| **मतदारसंघ** | : ११९-येवला, जिल्हा नाशिक. |



**इतर माहिती** : संस्थापक अध्यक्ष, मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट, बांद्रा, मुंबई माजी विश्वस्त, व्ही. जे. टी. आय. संस्था, मुंबई; संस्थापक, महात्मा फुले समता परिषद, या संस्थेमार्फत उपेक्षित पद दलित, मागासवर्गीयांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न तसेच, महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांच्या विचारांचा व आदर्शाचा प्रचार व प्रसारः माजी विश्वस्त, मुंबई पोर्ट ट्रस्ट : १९८५ 'दैवत' व १९९० 'नवरा बायको' या मराठी चित्रपटांची निर्मिती; १९७३ सदस्य, १९७३-८४ विरोधी पक्षनेते, १९८५ व १९९१ महापौर, मुंबई महानगरपालिकाः १९९१ अध्यक्ष, ऑल इंडिया कौन्सिल ऑफ मेयर्स; १९९१ पर्यंत शिवसेनेत, १९९१ नंतर काँग्रेस पक्षात कार्यरत, जून १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य संस्थापक सदस्य व जून १९९९ ते नोव्हेंबर १९९९ महाराष्ट्राचे पहिले प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षः १९८५-९०, १९९०-९५, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा. १९९६-२००२ व २००२-२००४ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; डिसेंबर १९९१ ते मार्च १९९३ महसूल खात्याचे मंत्री; मार्च १९९३ ते मार्च १९९५ गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधार, घरदुरुस्ती आणि पुनर्बांधणी खात्याचे मंत्री; १९९६ - १९९९ विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद; ऑक्टोबर १९९९ ते जानेवारी २००३ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व गृह आणि पर्यटन मंत्री, जानेवारी २००३ ते डिसेंबर २००३ उपमुख्यमंत्री व गृह मंत्री; नोव्हेंबर २००४ ते ऑक्टोबर २००९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) या खात्यांचे मंत्रीः नोव्हेंबर २००९ ते नोव्हेंबर २०१० दुसऱ्यांदा उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**(संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)**

## श्री. विजय ऊर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात

**जन्म** : ७ फेब्रुवारी, १९५३

**जन्म ठिकाण** : जोर्वे, तालुका : संगमनेर, जिल्हा : अहमदनगर.

**शिक्षण** : बी.ए. एल.एल.बी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती कांचन.

**अपत्ये** : एकूण ४ (एक मुलगा व तीन मुली)

**व्यवसाय** : शेती.

**पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

**मतदारसंघ** : २१७- संगमनेर, जिल्हा अहमदनगर.



**इतर माहिती** : विद्यार्थी जीवनात पुणे येथे फर्ग्युसन व विधी महाविद्यालयात असताना पाणी पंचायत चळवळीत सहभाग; १९८० विडी कामगार व शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आंदोलनात सक्रिय सहभाग नऊ दिवस कारावास; डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीत सक्रिय सहभाग; संगमनेर तालुक्याच्या शैक्षणिक विकासात सहभाग, भंडारदरा धरणाच्या पाण्याचे शेतीसाठी फेरवाटप व्हावे यासाठी केलेल्या आंदोलनाचे नेतृत्व, निळवंडे धरण पूर्ण व्हावे यासाठी चळवळ; १९८९ अध्यक्ष, राज्य विडी कामगार किमान वेतन समिती, अहवाल शासनास सादर करून महागाई निर्देशांकाप्रमाणे वेतनवाढीची शिफारस; दुष्काळग्रस्तांसाठी मदतकार्य; १९९८-२००० सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; २००८ मध्ये देशभक्त किसनवीर सामाजिक संस्थेच्या समाजकृतज्ञता पुरस्कार, २०१४ मध्ये यशवंत प्रतिष्ठान पुणेतर्फे दिला जाणारा यशवंत-वेणू पुरस्कार व २०१५ मध्ये माधवराव लिमये फाऊंडेशनचा कार्यक्षम आमदार पुरस्कार; १९८५-९०, १९९०-९५, १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-१४, २०१४-२०१९ महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य; विधिमंडळाच्या रोजगार हमी, आश्वासन, सार्वजनिक उपक्रम व पंचायत राज समित्यांचे सदस्य; ऑक्टोबर, १९९९ ते जुलै, २००४ पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे वगळून), लाभक्षेत्र विकास खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, २००४ ते ऑक्टोबर, २००९ जलसंधारण आणि खारजमीन खात्याचे मंत्री; नोव्हेंबर, २००९ ते नोव्हेंबर, २०१० कृषी जलसंधारण, रोजगार हमीयोजना आणि शालेय शिक्षण (अतिरिक्त कार्यभार) मंत्री; नोव्हेंबर, २०१० ते सप्टेंबर, २०१४ महसूल व खार जमिनी मंत्री; महसूल खात्याचा कारभार ऑनलाइन करण्यात पुढाकार; राज्यातील शेतजमिनीची नव्याने मोजणी करण्याचा निर्णय; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**(संदर्भ: १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)**

## डॉ. नितीन काशिनाथ राऊत

**जन्म** : ९ ऑक्टोबर १९५२.

**जन्म ठिकाण** : नागपूर, जिल्हा नागपूर.

**शिक्षण** : एम ए., एफ.बी.एम., सी.पी.एल., एम.एफ.ए. (नाट्य) पीएच.डी.

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सुमेधा

**अपत्ये** : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी)

**व्यवसाय** : उद्योग/व्यापार.

**पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय)

**मतदारसंघ** : ५७-नागपूर (उत्तर)



**इतर माहिती** : संकल्प संस्थेमार्फत समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणाचे कार्य; दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सोहळ्यासाठी दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या भाविकांना मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी सक्रिय साहाय्य, मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन; १९८८ व १९८९ मध्ये राष्ट्रीय एकात्मतेसाठी अनुक्रमे 'संकल्परन' व भीमज्योत यात्रेचे आयोजन; १९९१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १०० व्या जयंतीनिमित्त नागपूर येथील कस्तूरचंद पार्क येथे भव्य रॅली, मराठवाडा नामांतर आंदोलनात सक्रिय सहभाग; १९८९ चंद्रपूर येथे दलित साहित्य संमेलनात सहभाग; १९९१ विदर्भ साहित्य संमेलनात सहभाग; २००२ नागपूर येथे अस्मितादर्श रजत महोत्सव व साहित्य संमेलनाचे आयोजनः १९९० नागपूर जिल्ह्यातील मकरधोकडा येथील जातीय दंगलीतील दंगलग्रस्तांना सर्वतोपरी मदत; १९९१ मोवाड व नागपूर येथील पूरग्रस्तांना मदत, १९ एप्रिल २००० संविधान बचाओ रॅली; १९७० पासून राजकीय क्षेत्रात कार्य; स्व. इंदिरा गांधीच्या अटकेच्या वेळी त्यांच्या समर्थनार्थ जेल भरो आंदोलनात सहभाग; १९९१ पासून लोकसभा निवडणुकामध्ये उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्राचे प्रभारी; कोलकाता, बंगलोर व नवी दिल्लीमध्ये आयोजित अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या खुल्या अधिवेशनात सहभाग; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीचे सदस्य; आरक्षण अधिनियमन समितीचे सदस्य, वनोत्पादनाच्या चोरी संबंधीच्या संयुक्त समितीचे सदस्य; विधान मंडळाच्या रोजगार स्वयंरोजगार समितीचे सदस्य; डिसेंबर २००८ ते नोव्हेंबर २००९ गृह, तुरुंग, राज्य उत्पादन शुल्क व कामगार खात्याचे राज्यमंत्री; २०१४ मध्ये रोहयो आणि जल संवर्धन विभागाचे मंत्री म्हणून कार्यरत, त्यापूर्वी त्यांच्याकडे पशुसंवर्धन, दुग्ध आणि मत्स्यव्यवसाय विकास हे विभाग होते. ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**(संदर्भ: १२ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)**

**राज्याच्या विकासात शेतकरी, सर्वसामान्य कष्टकरी जनता केंद्रस्थानी ठेवून स्वच्छ, पारदर्शक आणि निर्णयाभिमुख प्रशासन देणे, राज्याची आर्थिक स्थिती जनतेसमोर मांडतानाच ती सुधारण्यावर भर देणे हाच नव्या शासनाचा रोडमॅप आहे. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी विधिमंडळाच्या संयुक्त सभागृहात केलेल्या अभिभाषणात यावर विशेष भर दिला.**

# नव्या महाराष्ट्राचा रोडमॅप

राज्यातील ७० टक्के जनता शेती आणि शेतीशी निगडित व्यवसायावर अवलबूंन आहे, त्यामुळे राज्याला शाश्वत विकासाच्या वाटेवर घेऊन जाण्यासाठी शेतकरी चिंतामुक्त करण्यावर शासनाचा भर राहील. शेतकऱ्यांना पीक कर्जमुक्त व चिंतामुक्त करण्यासाठी शासन आवश्यक ती कार्यवाही करेल. ग्रामीण पतक्षेत्राची दुरवस्था दूर करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील. शेतमालाला योग्य भाव मिळण्याच्या दृष्टीने, मराठवाडा, विदर्भातील दुष्काळग्रस्त भागामध्ये शाश्वत पाणीपुरवठा यंत्रणा उभारण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना घेतल्या जातील.



## भूमिपुत्रांना आरक्षण

खासगी क्षेत्रातील रोजगारांमध्ये भूमिपुत्रांसाठी ८० टक्के आरक्षण ठेवण्यासाठी कायदा केला जाईल. शासनातील रिक्त पदेही भरली जातील, त्यामुळे रोजगाराच्या संधीत वाढ होईल. महिलांना संधी आणि त्यांची सुरक्षितता याला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याचा आटोकाट प्रयत्न केला जाईल. राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी उपाययोजना हाती घेण्यात येईल. मानव विकास कार्यक्रमांतर्गत तुलनात्मकदृष्ट्या मागास गटांना विशेष निधी पुरवून आरोग्य, शिक्षण आणि उपजीविका क्षेत्रावर अधिक भर देण्यात येईल.

## पायाभूत सुविधांवर भर

राज्याचा आर्थिक विकास करताना पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यात आणि पर्यवारणाच्या संरक्षणाकडे विशेषत्वाने लक्ष देण्यात येईल. यात आर्थिकदृष्ट्या समाजाच्या सर्वात शेवटच्या पायरीवर असलेल्या घटकाच्या उन्नतीसाठी विशेषत्वाने प्राधान्य देण्यात येईल. यासाठी दहा रुपये इतक्या वाजवी दरात जेवणाची थाळी पुरवण्यासाठी उपाययोजना करण्यात येईल.



## रोजगार निर्मिती

स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याकरिता माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूक आकर्षित करण्यात येईल. त्यासाठी नवे धोरण करण्यात येईल. सुशिक्षित बेरोजगार युवकांना अधिछात्रवृत्ती देण्यासाठी कार्यक्रम निश्चित करून नोकरी करणाऱ्या महिलांसाठी जिल्ह्यांची मुख्यालये व प्रमुख शहरात कालबद्धरीतीने वसतिगृहे बांधली जातील. अंगणवाडी सेविका व आशा कार्यकर्त्यांच्या सेवासुविधांमध्ये सुधारणा करण्यात येईल. राज्यात आठ लाख स्वयंसाहाय्यता बचतगटाच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न केले जातील.



## आरोग्य सुविधा

रोगनिदान चाचण्या करण्याकरिता तालुकास्तरावर एक रुपया क्लिनिक ही योजना सुरू करण्यात येणार असून, सर्व जिल्ह्यांत टप्प्याटप्प्याने अतिविशेषोपचार रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये स्थापण्यात येतील. सर्वांसाठी आरोग्य विमा छत्र पुरवण्यासाठी विविध आरोग्य विमा कार्यक्रमांचे एकत्रीकरण करण्यात येईल. अधिकाधिक उद्योग स्थापन व्हावेत यासाठी आर्थिक व आर्थिकेतर सवलती देऊन परवानगी प्रक्रिया सुलभ करण्यात येईल.

## सुरक्षा

सर्व पोलीस ठाणी, राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार नोंदणी पोर्टलशी जोडण्यात येतील. सायबर गुन्हे अन्वेषणामधील पोलिसांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार.

## सांस्कृतिक

ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी गडकिल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याबरोबरच मुंबई येथे मराठी भाषा भवन मुख्य केंद्र उभारले जाईल. ऐरोली येथे मराठी भाषा उपकेंद्र स्थापन करण्यात येईल.



## इतर

ज्येष्ठ नागरिकांचे सामाजिक सुरक्षा जाळे वाढवण्यासाठी उपाययोजनेवर भर देण्यासह अन्न व औषधीद्रव्ये विनियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरूद्ध कठोर कारवाई केली जाईल. प्लास्टिक बंदीबाबत लोकसहभाग वाढवून ती यशस्वीपणे राबवण्यात येईल. राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक किनारी प्रक्षेत्र व्यवस्थापन प्रकल्पाची अंमलबजावणी करून, किनारपट्टीत अशास्त्रीय मच्छीमारी करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. पारंपरिक मच्छिमारांना संरक्षण देण्यात येईल. महात्मा गांधीजींच्या १५०व्या जयंती निमित्ताने त्यांच्या विचारांचा आणि आदर्शांचा नव्या पिढीला परिचय व्हावा यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. महाराष्ट्र कर्नाटक सीमेच्या संबंधात दावा केलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक जनतेच्या हक्कांचे संरक्षण करून हा लढा न्यायालयात जोरकसपणे लढला जाईल.

**महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ मध्ये**
**२८८ विधानसभा मतदार संघातील विजयी उमेदवार.**

# आपले लोकप्रतिनिधी




**ॲड. के.सी. पाडवी**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
१ – अक्कलकुवा (अ.ज.)



**राजेश उदेसिंग पाडवी**
भारतीय जनता पक्ष
२ – शहादा (अ.ज.)



**विजयकुमार गावीत**
भारतीय जनता पक्ष
३ – नंदुरबार (अ.ज.)



**शिरीषकुमार नाईक**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
४ – नवापुर (अ.ज.)




**मंजुळा तुळशीराम गावीत**
अपक्ष
५ – साक्री (अ.ज.)



**कुणाल रोहिदास पाटील**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
६ – धुळे ग्रामीण



**शाह फारुख अन्वर**
एमआयएम
७ – धुळे शहर



**जयकुमार रावल**
भारतीय जनता पक्ष
८ – शिंदखेडा




**काशिराम वेचान पावरा**
भारतीय जनता पक्ष
९ – शिरपूर (अ.ज.)



**लताबाई चंद्रकांत सोनवणे**
शिवसेना
१० – चोपडा (अ.ज.)



**शिरीष मधुकरराव चौधरी**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
११ – रावेर



**संजय वामन सावकारे**
भारतीय जनता पक्ष
१२ – भुसावळ (अ.जा.)





**सुरेश दामू भोळे**
भारतीय जनता पक्ष
१३ – जळगाव शहर




**गुलाबराव रघुनाथ पाटील**
शिवसेना
१४ – जळगाव ग्रामीण



**अनिल भाईदास पाटील**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१५ – अमळनेर



**चिमणराव रुपचंद पाटील**
शिवसेना
१६ – एरंडोल



**मंगेश रमेश चव्हाण**
भारतीय जनता पक्ष
१७ – चाळीसगाव



**किशोर पाटील**
शिवसेना
१८ – पाचोरा



**गिरीश दत्तात्रय महाजन**
भारतीय जनता पक्ष
१९ – जामनेर



**चंद्रकांत निंबा पाटील**
अपक्ष
२० – मुक्ताईनगर



**राजेश पंडितराव एकडे**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२१ – मलकापूर



**संजय रामभाऊ गायकवाड**
शिवसेना
२२ – बुलडाणा



**श्वेता विद्याधर महाले**
भारतीय जनपा पक्ष
२३ – चिखली



**डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२४ – सिंदखेड राजा




**संजय रायमूलकर**
शिवसेना
२५ – मेहकर (अ.जा.)



**आकाश फुंडकर**
भारतीय जनता पक्ष
२६ – खामगाव



**डॉ. संजय श्रीराम कुटे**
भारतीय जनता पक्ष
२७ – जळगाव, जामोद



**प्रकाश भारसाकळे**
भारतीय जनता पक्ष
२८ – अकोट






**नितीनकुमार टाले**
शिवसेना
२९ – बाळापूर



**गोवर्धन मांगीलाल शर्मा**
भारतीय जनता पक्ष
३० – अकोला पश्चिम



**रणधीर सावरकर**
भारतीय जनता पक्ष
३१ – अकोला पूर्व




**हरिष पिंपळे**
भारतीय जनता पक्ष
३२ – मूर्तिजापूर (अ.जा.)




**अमित सुभाषराव झनक**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
३३ – रिसोड



**लखन सहदेव मलिक**
भारतीय जनता पक्ष
३४ – वाशिम (अ.जा.)



**राजेंद्र सुखानंद पाटणी**
भारतीय जनता पक्ष
३५ – करंजा



**प्रताप अडसड**
भारतीय जनता पक्ष
३६ – धामणगांव रेल्वे



**रवी राणा**
अपक्ष
३७ – बडनेरा




**सुलभा संजय खोडके**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
३८ – अमरावती



**ॲड. यशोमती ठाकूर**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
३९ – तिवसा



**बळवंत वानखडे**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
४० – दर्यापूर (अ.जा.)



**राजकुमार पटेल**
प्रहार जनशक्ती पक्ष
४१ – मेळघाट (अ.ज.)



**बच्चु ऊर्फ ओमप्रकाश कडू**
प्रहार जनशक्ती पक्ष
४२ – अचलपूर



**देवेंद्र भुयार**
स्वाभिमानी पक्ष
४३ – मोर्शी



**दादाराव यादवरावजी केचे**
भारतीय जनता पक्ष
४४ – आर्वी






**रणजित कांबळे**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
४५ – देवळी



**समीर त्र्यंबकराव कुणावार**
भारतीय जनता पक्ष
४६ – हिंगणघाट



**डॉ. पंकज भोयर**
भारतीय जनता पक्ष
४७ – वर्धा



**अनिल देशमुख**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
४८ – काटोल



**सुनील केदार**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
४९ – सावनेर



**समीर मेघे**
भारतीय जनता पक्ष
५० – हिंगणा



**राजू पारवे**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
५१ – उमरेड (अ.जा.)



**देवेंद्र फडणवीस**
भारतीय जनता पक्ष
५२ – नागपूर दक्षिण–पश्चिम



**मोहन मते**
भारतीय जनता पक्ष
५३ – नागपूर दक्षिण



**कृष्णा खोपडे**
भारतीय जनता पक्ष
५४ – नागपूर पूर्व



**विकास कुंभारे**
भारतीय जनता पक्ष
५५ – नागपूर मध्य



**विकास ठाकरे**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
५६ – नागपूर पश्चिम



**डॉ. नितीन राऊत**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
५७ – नागपूर उत्तर (अ.जा.)



**टेकचंद सावरकर**
भारतीय जनता पक्ष
५८ – कामठी



**आशिष जयस्वाल**
अपक्ष
५९ – रामटेक



**राजू कारेमोरे**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
६० – तुमसर





**नरेंद्र भोंडेकर**
अपक्ष
६१ – भंडारा (अ.जा.)



**नानाभाऊ फाल्गुनराव पटोले**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
६२ – साकोली



**मनोहर गोवर्धन चंद्रिकापुरे**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
६३–अर्जुनी, मोरगाव (अ.जा.)



**विजय भरतलाल रहांगडाले**
भारतीय जनता पक्ष
६४ – तिरोडा



**विनोद संतोष अग्रवाल**
अपक्ष
६५ – गोंदिया



**सहसराम मारोती कोरोटे**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
६६ – आमगाव (अ.ज.)



**कृष्णा दामाजी गजबे**
भारतीय जनता पक्ष
६७ – आरमोरी (अ.ज.)



**डॉ. देवराव मादगुजी होळी**
भारतीय जनता पक्ष
६८ – गडचिरोली (अ.ज.)




**धर्मरावबाबा आत्राम**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
६९ – अहेरी (अ.ज.)



**सुभाष धोटे**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
७० – राजूरा




**किशोर जोरगेवार**
अपक्ष
७१ – चंद्रपूर (अ.जा.)



**सुधीर मुनगंटीवार**
भारतीय जनता पक्ष
७२ – बल्लारपूर



**विजय वडेट्टीवार**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
७३ – ब्रह्मपुरी




**बंटी भांगडिया**
भारतीय जनता पक्ष
७४ – चिमूर



**प्रतिभा धानोरकर**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
७५ – वरोरा




**संजीवरेड्डी बोदकुरवार**
भारतीय जनता पक्ष
७६ – वणी






**डॉ. अशोक रामाजी उईके**
भारतीय जनता पक्ष
७७ – राळेगाव (अ.ज.)




**मदन मधुकर येरावार**
भारतीय जनता पक्ष
७८ – यवतमाळ



**संजय दुलिचंद राठोड**
शिवसेना
७९ – दिग्रस



**डॉ. संदीप प्रभाकर धुर्वे**
भारतीय जनता पक्ष
८० – अर्णी (अ.ज.)



**इंद्रनिल मनोहर नाईक**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
८१ – पुसद



**नामदेव जयराम ससाने**
भारतीय जनता पक्ष
८२ – उमरखेड (अ.जा.)



**भीमराव रामजी केराम**
भारतीय जनता पक्ष
८३ – किनवट



**माधवराव पाटील–जळगावकर**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
८४ – हदगाव




**अशोकराव शंकरराव चव्हाण**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
८५ – भोकर



**बालाजी कल्याणकर**
शिवसेना
८६ – नांदेड उत्तर




**मोहनराव मारोतराव हंबर्डे**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
८७ – नांदेड दक्षिण



**श्यामसुंदर शिंदे**
शेतकरी कामगार पक्ष
८८ – लोहा



**राजेश पवार**
भारतीय जनता पक्ष
८९ – नायगाव




**रावसाहेब अंतापूरकर**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
९० – देगलूर (अ.जा.)




**तुषार गोविंदराव राठोड**
भारतीय जनता पक्ष
९१ – मुखेड




**चंद्रकांत रमाकांत नवघरे**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
९२ – वसमत





**संतोष लक्ष्मणराव बांगर**
शिवसेना
९३ – कळमनुरी



**तान्हाजी मुटकुळे**
भारतीय जनता पक्ष
९४ – हिंगोली



**मेघना साकोरे–बोर्डीकर**
भारतीय जनता पक्ष
९५ – जिंतूर




**डॉ. राहुल पाटील**
शिवसेना
९६ – परभणी



**रत्नाकर माणिकराव गुट्टे**
राष्ट्रीय समाज पक्ष
९७ – गंगाखेड



**सुरेश वरपुडकर**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
९८ – पाथरी



**बबनराव दत्तात्रय लोणीकर**
भारतीय जनता पक्ष
९९ – परतूर




**राजेश टोपे**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१०० – घनसावंगी




**कैलास गोरंट्याल**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
१०१ – जालना



**नारायण कुचे**
भारतीय जनता पक्ष
१०२ – बदनापूर (अ.जा.)




**संतोष रावसाहेब दानवे**
भारतीय जनता पक्ष
१०३ – भोकरदन



**अब्दुल सत्तार अब्दुल नबी**
शिवसेना
१०४ – सिल्लोड



**उदयसिंग राजपूत**
शिवसेना
१०५ – कन्नड



**हरिभाऊ किसनराव बागडे**
भारतीय जनता पक्ष
१०६ – फुलंब्री



**प्रदीप जैस्वाल**
शिवसेना
१०७ – औरंगाबाद मध्य




**संजय पांडुरंग शिरसाट**
शिवसेना
१०८–औरंगाबाद प.(अ.जा.)






**अतुल मोरेश्वर सावे**
भारतीय जनता पक्ष
१०९ – औरंगाबाद पूर्व



**संदिपानराव भुमरे**
शिवसेना
११० – पैठण



**प्रशांत बन्सीलाल बंब**
भारतीय जनता पक्ष
१११ – गंगापूर




**रमेश बोरनारे**
शिवसेना
११२ – वैजापूर



**सुहास कांदे**
शिवसेना
११३ – नांदगाव



**मोहम्मद इस्माईल अब्दूल खालिक**
एमआयएम
११४ – मालेगाव मध्य



**दादाजी भुसे**
शिवसेना
११५ – मालेगाव बाह्य




**दिलीप मंगळू बोरसे**
भारतीय जनता पक्ष
११६ – बागलाण (अ.ज.)




**नितीन अर्जुन पवार**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
११७ – कळवण (अ.ज.)



**राहूल आहेर**
भारतीय जनता पक्ष
११८ – चांदवड



**छगन भुजबळ**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
११९ – येवला



**ॲड. माणिकराव कोकाटे**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१२० – सिन्नर



**दिलीपराव बनकर**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१२१ – निफाड



**नरहरी झिरवाळ**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१२२ – दिंडोरी (अ.ज.)



**ॲड. राहुल ढिकले**
भारतीय जनता पक्ष
१२३ – नाशिक पूर्व



**देवयानी फरांदे**
भारतीय जनता पक्ष
१२४ – नाशिक मध्य





**सीमा हिरे**
भारतीय जनता पक्ष
१२५ – नाशिक पश्चिम



**सरोज अहिरे**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१२६ – देवळाली (अ.जा.)



**हिरामण खोसकर**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
१२७ – इगतपूरी (अ.ज.)



**विनोद भिवा निकोले**
माकप
१२८ – डहाणू (अ.ज.)



**सुनिल चंद्रकांत भुसारे**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१२९ – विक्रमगड (अ.ज.)



**श्रीनिवास वनगा**
शिवसेना
१३० – पालघर (अ.ज.)



**राजेश पाटील**
बहुजन विकास आघाडी
१३१ – बोईसर (अ.ज.)



**क्षितिज हितेंद्र ठाकूर**
बहुजन विकास आघाडी
१३२ – नालासोपारा



**हितेंद्र विष्णू ठाकूर**
बहुजन विकास आघाडी
१३३ – वसई



**शांताराम तुकाराम मोरे**
शिवसेना
१३४ – भिवंडी ग्रामीण (अ.ज.)



**दौलत दरोडा**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१३५ – शहापूर (अ.ज.)



**महेश प्रभाकर चौघुले**
भारतीय जनता पक्ष
१३६ – भिवंडी पश्चिम



**रईस कासम शेख**
समाजवादी पक्ष
१३७ – भिवंडी पूर्व



**विश्वनाथ भोईर**
शिवसेना
१३८ – कल्याण पश्चिम




**किसन कथोरे**
भारतीय जनता पक्ष
१३९ – मुरबाड



**डॉ. बालाजी किणीकर**
शिवसेना
१४० – अंबरनाथ (अ.जा.)





**कुमार आयलानी**
भारतीय जनता पक्ष
१४१ – उल्हासनगर



**गणपत काळू गायकवाड**
भारतीय जनता पक्ष
१४२ – कल्याण पूर्व



**रवींद्र दत्तात्रय चव्हाण**
भारतीय जनता पक्ष
१४३ – डोंबिवली



**प्रमोद पाटील**
महाराष्ट्र नवनिर्माण सेना
१४४ – कल्याण ग्रामीण



**गीता जैन**
अपक्ष
१४५ – मिरा-भाईंदर




**प्रताप बाबूराव सरनाईक**
शिवसेना
१४६ – ओवळा, माजिवडा



**एकनाथ संभाजी शिंदे**
शिवसेना
१४७ – कोपरी, पाचपाखडी



**संजय केळकर**
भारतीय जनता पक्ष
१४८ – ठाणे




**जितेंद्र सतीश आव्हाड**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१४९ – मुंब्रा, कळवा



**गणेश नाईक**
भारतीय जनता पक्ष
१५० – ऐरोली



**मंदा विजय म्हात्रे**
भारतीय जनता पक्ष
१५१ – बेलापूर



**सुनील दत्तात्रय राणे**
भारतीय जनता पक्ष
१५२ – बोरिवली



**मनीषा अशोक चौधरी**
भारतीय जनता पक्ष
१५३ – दहीसर



**प्रकाश राजाराम सुर्वे**
शिवसेना
१५४ – मागाठाणे



**मिहीर चंद्रकांत कोटेचा**
भारतीय जनता पक्ष
१५५ – मुलुंड



**सुनील राजाराम राऊत**
शिवसेना
१५६ – विक्रोळी





**रमेश कोरगावकर**
शिवसेना
१५७ – भांडूप पश्चिम



**रवींद्र वायकर**
शिवसेना
१५८ – जोगेश्वरी पूर्व



**सुनील प्रभू**
शिवसेना
१५९ – दिंडोशी



**अतुल भातखळकर**
भारतीय जनता पक्ष
१६० – कांदिवली पूर्व



**योगेश सागर**
भारतीय जनता पक्ष
१६१ – चारकोप



**अस्लम रमजानअली शेख**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
१६२ – मालाड पश्चिम




**विद्या जयप्रकाश ठाकूर**
भारतीय जनता पक्ष
१६३ – गोरेगाव



**डॉ. भारती लव्हेकर**
भारतीय जनता पक्ष
१६४ – वर्सोवा



**अमित भास्कर साटम**
भारतीय जनता पक्ष
१६५ – अंधेरी पश्चिम



**रमेश लटके**
शिवसेना
१६६ – अंधेरी पूर्व



**ॲड. पराग अळवणी**
भारतीय जनता पक्ष
१६७ – विलेपार्ले



**दिलीप भाऊसाहेब लांडे**
शिवसेना
१६८ – चांदिवली



**राम कदम**
भारतीय जनता पक्ष
१६९ – घाटकोपर पश्चिम



**पराग शाह**
भारतीय जनता पक्ष
१७० – घाटकोपर पूर्व



**अबू आसिम आझमी**
समाजवादी पक्ष
१७१ – मानखुर्द, शिवाजीनगर



**नवाब मलिक**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
१७२ – अणुशक्तीनगर





**प्रकाश वैकुंठ फातर्फेकर**
शिवसेना
१७३ – चेंबूर



**मंगेश अनंत कुडाळकर**
शिवसेना
१७४ – कुर्ला (अ.जा.)



**संजय गोविंद पोतनीस**
शिवसेना
१७५ – कलिना



**झिशान बाबा सिद्दीकी**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
१७६ – वांद्रे पूर्व



**ॲड. आशिष शेलार**
भारतीय जनता पक्ष
१७७ – वांद्रे पश्चिम



**प्रा. वर्षा गायकवाड**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
१७८ – धारावी (अ.जा.)



**कॅ. आर. तमिल सेल्वन**
भारतीय जनता पक्ष
१७९ – सायन कोळीवाडा



**कालिदास कोळंबकर**
भारतीय जनता पक्ष
१८० – वडाळा



**सदानंद सरवणकर**
शिवसेना
१८१ – माहीम



**आदित्य उद्धव ठाकरे**
शिवसेना
१८२ – वरळी



**अजय विनायक चौधरी**
शिवसेना
१८३ – शिवडी



**यामिनी यशवंत जाधव**
शिवसेना
१८४ – भायखळा




**मंगलप्रभात लोढा**
भारतीय जनता पक्ष
१८५ – मलबार हिल



**अमिन पटेल**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
१८६ – मुंबादेवी



**ॲड. राहुल नार्वेकर**
भारतीय जनता पक्ष
१८७ – कुलाबा



**प्रशांत रामशेठ ठाकूर**
भारतीय जनता पक्ष
१८८ – पनवेल





**महेंद्र थोरवे**
शिवसेना
१८९ - कर्जत



**महेश बालदी**
अपक्ष
१९० - उरण



**रवींद्र पाटील**
भारतीय जनता पक्ष
१९१ - पेण



**महेंद्र दळवी**
शिवसेना
१९२ - अलिबाग



**आदिती सुनील तटकरे**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१९३ - श्रीवर्धन



**भरत गोगावले**
शिवसेना
१९४ - महाड




**अतुल वल्लभ बेनके**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१९५ - जुन्नर



**दिलीप वळसे-पाटील**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१९६ - आंबेगाव




**दिलीप मोहिते-पाटील**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१९७ - खेड, आळंदी



**अशोक रावसाहेब पवार**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
१९८ - शिरूर



**ॲड. राहुल सुभाषराव कुल**
भारतीय जनता पक्ष
१९९ - दौंड



**दत्तात्रय विठोबा भरणे**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२०० - इंदापूर



**अजित अनंतराव पवार**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२०१ - बारामती



**संजय जगताप**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२०२ - पुरंदर



**संग्राम अनंतराव थोपटे**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२०३ - भोर



**सुनील शंकरराव शेळके**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२०४ - मावळ





**लक्ष्मण पांडुरंग जगताप**
भारतीय जनता पक्ष
२०५ – चिंचवड



**अण्णा दादू बनसोडे**
राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष
२०६ – पिंपरी (अ.जा.)



**महेश किसन लांडगे**
भारतीय जनता पक्ष
२०७ – भोसरी



**सुनील विजय टिंगरे**
राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष
२०८ – वडगाव, शेरी



**सिद्धार्थ अनिल शिरोळे**
भारतीय जनता पक्ष
२०९ – शिवाजीनगर



**चंद्रकांत (दादा) पाटील**
भारतीय जनता पक्ष
२१० – कोथरूड



**भीमराव धोंडिबा तापकीर**
भारतीय जनता पक्ष
२११ – खडकवासला



**माधुरी सतीश मिसाळ**
भारतीय जनता पक्ष
२१२ – पर्वती



**चेतन विठ्ठल तुपे**
राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष
२१३ – हडपसर



**सुनील ज्ञानदेव कांबळे**
भारतीय जनता पक्ष
२१४ – पुणे छावणी (अ.जा.)



**मुक्ता शैलेश टिळक**
भारतीय जनता पक्ष
२१५ – कसबापेठ



**डॉ. किरण यमाजी लहामटे**
राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष
२१६ – अकोले (अ.ज.)




**विजय उर्फ बाळासाहेब थोरात**
भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस पक्ष
२१७ – संगमनेर



**राधाकृष्ण विखे-पाटील**
भारतीय जनता पक्ष
२१८ – शिर्डी



**आशुतोष अशोकराव काळे**
राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष
२१९ – कोपरगाव



**लहू नाथा कानडे**
भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस पक्ष
२२० – श्रीरामपूर (अ.जा.)





**शंकरराव यशवंतराव गडाख**
क्रांतिकारी शेतकरी पक्ष
२२१ – नेवासा



**मोनिका राजीव राजळे**
भारतीय जनता पक्ष
२२२ – शेवगाव



**प्राजक्त प्रसादराव तनपुरे**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
२२३ – राहुरी



**निलेश ज्ञानदेव लंके**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
२२४ – पारनेर



**संग्राम अरुणकाका जगताप**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
२२५ – अहमदनगर शहर




**बबनराव भिकाजी पाचपुते**
भारतीय जनता पक्ष
२२६ – श्रीगोंदा




**रोहित राजेंद्र पवार**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
२२७ – कर्जत, जामखेड



**लक्ष्मण माधवराव पवार**
भारतीय जनता पक्ष
२२८ – गेवराई



**प्रकाश सुंदरराव सोळंके**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
२२९ – माजलगाव



**संदीप रवींद्र क्षीरसागर**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
२३० – बीड



**बाळासाहेब आजबे**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
२३१ – आष्टी



**नमिता अक्षय मुंदडा**
भारतीय जनता पक्ष
२३२ – केज (अ.जा.)



**धनंजय पंडितराव मुंडे**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
२३३ – परळी



**धीरज विलासराव देशमुख**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
२३४ – लातूर ग्रामीण



**अमित विलासराव देशमुख**
भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
२३५ –लातूर शहर



**बाबासाहेब पाटील**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
२३६ – अहमदपूर



**संजय बाबुराव बनसोडे**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
२३७ – उदगीर (अ.जा.)





**संभाजी पाटील-निलंगेकर**
भारतीय जनता पक्ष
२३८ - निलंगा



**अभिमन्यू दत्तात्रय पवार**
भारतीय जनता पक्ष
२३९ - औसा



**ज्ञानराज धोंडिराम चौगुले**
शिवसेना
२४० - उमरगा (अ.जा.)



**राणाजगजितसिंह पाटील**
भारतीय जनता पक्ष
२४१ - तुळजापूर



**कैलास घाडगे-पाटील**
शिवसेना
२४२ - उस्मानाबाद



**तानाजी जयवंत सावंत**
शिवसेना
२४३ - परंडा



**संजयमामा विठ्ठलराव शिंदे**
अपक्ष
२४४ - करमाळा



**बबनराव विठ्ठलराव शिंदे**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२४५ - माढा



**राजेंद्र विठ्ठल राऊत**
अपक्ष
२४६ - बार्शी



**यशवंत माने**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२४७ - मोहोळ (अ.जा.)



**विजय देशमुख**
भारतीय जनता पक्ष
२४८ - सोलापूर शहर उत्तर



**प्रणिती शिंदे**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२४९ - सोलापूर शहर मध्य



**सचिन कल्याणशेट्टी**
भारतीय जनता पक्ष
२५० - अक्कलकोट




**सुभाष देशमुख**
भारतीय जनता पक्ष
२५१ - सोलापूर शहर दक्षिण



**भारत भालके**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२५२ - पंढरपूर



**ॲड. शहाजीबापू पाटील**
शिवसेना
२५३ - सांगोला



**राम विठ्ठल सातपुते**
भारतीय जनता पक्ष
२५४ - माळशिरस (अ.जा.)





**दीपक प्रल्हाद चव्हाण**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२५५ - फलटण (अ.जा.)



**मकरंद लक्ष्मण जाधव**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२५६ - वाई



**महेश संभाजीराजे शिंदे**
शिवसेना
२५७ - कोरेगाव



**जयकुमार भगवानराव गोरे**
भारतीय जनता पक्ष
२५८ - माण




**शामराव उर्फ बाळासाहेब पाटील**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२५९ - कराड उत्तर




**पृथ्वीराज दाजीसाहेब चव्हाण**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२६० - कराड दक्षिण




**शंभूराज शिवाजीराव देसाई**
शिवसेना
२६१ - पाटण



**शिवेंद्रसिंहराजे भोसले**
भारतीय जनता पक्ष
२६२ - सातारा



**योगेशदादा कदम**
शिवसेना
२६३ - दापोली



**भास्कर भाऊराव जाधव**
शिवसेना
२६४ - गुहागर



**शेखर गोविंदराव निकम**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२६५ - चिपळूण



**उदय रवींद्र सामंत**
शिवसेना
२६६ - रत्नागिरी



**राजन प्रभाकर साळवी**
शिवसेना
२६७ - राजापूर



**नितेश नारायण राणे**
भारतीय जनता पक्ष
२६८ - कणकवली



**वैभव विजय नाईक**
शिवसेना
२६९ - कुडाळ



**दीपक वसंतराव केसरकर**
शिवसेना
२७० - सावंतवाडी



**राजेश नरसिंगराव पाटील**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२७१ - चंदगड





**प्रकाश आबिटकर**
शिवसेना
२७२ – राधानगरी



**हसन मियालाल मुश्रीफ**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२७३ – कागल



**ऋतुराज संजय पाटील**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२७४ – कोल्हापूर दक्षिण



**पी. एन. पाटील**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२७५ – करवीर




**चंद्रकांत पंडित जाधव**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२७६ – कोल्हापूर उत्तर



**डॉ. विनय कोरे (सावकर)**
जनसुराज्य शक्ती
२७७ – शाहूवाडी



**राजू जयवंतराव आवळे**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२७८ – हातकणंगले (अ.जा.)




**प्रकाश आण्णा आवाडे**
अपक्ष
२७९ – इचलकरंजी




**राजेंद्र शामगोंडा पाटील**
अपक्ष
२८० – शिरोळ



**डॉ. सुरेश दगडू खाडे**
भारतीय जनता पक्ष
२८१ – मिरज (अ.जा.)



**धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ**
भारतीय जनता पक्ष
२८२ – सांगली



**जयंत राजाराम पाटील**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२८३ – इस्लामपूर



**मानसिंग फत्तेसिंगराव नाईक**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२८४ – शिराळा, वाळवा



**विश्वजित पतंगराव कदम**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२८५ – पलूस, कडेगाव



**अनिलभाऊ बाबर**
शिवसेना
२८६ – खानापूर



**सुमनवहिनी आर. आर. पाटील**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
२८७ – तासगाव, कवठेमहांकाळ



**विक्रमसिंह सावंत**
भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
२८८ – जत

संदर्भ : भारत निवडणूक आयोग यांनी २५ ऑक्टोबर २०१९ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्धी केलेली यादी.



भारतरत्न
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## महापरिनिर्वाण दिन विशेष

जगात काही थोर विभूतींचे ग्रंथप्रेम प्रसिद्ध आहे. 'ग्रंथ वाचण्याची मनाई करून मला कोणी राजा बनवले तर मी त्याचा त्याग करीन' असे मेकॉले म्हणाला होता. 'अखेरच्या क्षणी कपाटातील ग्रंथांचा वियोग होणार' म्हणून वॉल्टर स्कॉट ढसढसा रडला होता. 'जो माझ्या पुस्तकांना हात लावील तो माझ्या हृदयाला स्पर्श करेल' असे साने गुरुजी नेहमी म्हणायचे. त्याच परंपरेत 'ग्रंथामुळे जीवनाला अर्थ येतो' असे सांगणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरसुद्धा होते. डॉ. आंबेडकरांना जीवनात ज्ञानप्राप्तीसाठी आभाळाएवढे दुःख व अनंत अडचणींना सामोरे जावे लागले.

# ज्ञानसूर्य

**प्रतापराव साळुंखे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अगदी बालपणापासून वाचनाचा छंद होता. वडिलांनी खाऊसाठी दिलेले पैसे खर्च न करता त्यातून ते जुने ग्रंथ खरेदी करीत आणि वाचीत. ग्रंथाविना क्षणभरसुद्धा त्यांना करमत नसे. कॉलेजच्या प्रांगणात त्यांनी आपल्या खऱ्या वाचनास सुरुवात केली. अभ्यासाची पुस्तके सोडून इतर पुस्तके वाचण्याची त्यांना आवड होती. त्यांचे असे वाचन त्यांच्या वडिलांना मुळीच आवडत नसे. ते म्हणत, 'आधी अभ्यास आणि मग इतर वाचन' परंतु भीमराव त्यांना म्हणायचे, 'बाबा, मी कधी अनुत्तीर्ण होत नाही. दरवर्षी पास होतो मग माझ्या पाठीमागे हे अभ्यासाचे टुमणे का लावता?'

अमेरिकेत डॉ. आंबेडकरांनी विद्याव्यासंगात स्वतःला वाहून घेतले होते. त्यांनी असा पक्का निर्धार केला की, 'यापुढील सारे जीवन अध्ययनात घालवायचे !' या प्रभावी ध्येयवादी घोषणेने त्यांची जीवनपताका पुढे बहरत गेली. आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठात समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास आणि विशेषतः पब्लिक फायनान्स या विषयाचा नेटाने अभ्यास करून एम.ए., पीएच.डी. पदव्या प्राप्त केल्या. अमेरिकेतील एका विद्वान



## ग्रंथांसाठी घरे

बाबासाहेबांनी मुंबईत 'राजगृह' या नावाने ग्रंथांसाठी घर उभारले. या ठिकाणी २५,००० ग्रंथ होते. आचार्य मो.वा. दोंदे म्हणतात, 'डॉक्टर साहेब पुस्तकांना प्राणापलीकडे मानतात व त्यांची जोपासनासुद्धा प्राणापलीकडे ठेवतात. आपल्या स्वतःच्या खासगी ग्रंथसंग्रहासाठी आपल्या घराचा एक मजला मुद्दाम संग्रहालय आणि वाचनालय अशा सोयीने त्यांनी बांधला हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. डॉक्टर साहेबांनी आपली पुस्तके कशी नीट राहतील अशा दृष्टीने आपले घर बांधले. एक मोठा दिवाणखाना, त्या दिवाणखान्यात सभोवार गॅलरी, पुस्तकांनी भरलेली कपाटे, मधूनमधून ठेवलेल्या घडवंच्या, तसेच जेथे तेथे मांडलेली लहान-लहान टेबले व खुर्च्या, सर्वत्र पुस्तकांच्या रांगाच्या रांगा. इतकेच नाही तर अमुक एक पुस्तक कुठे आहे, कोणत्या रंगाचे आहे, त्याचे कव्हर कसे आहे, कोणत्या कपाटात आहे याची माहिती डॉक्टर साहेब अनेक प्रसंगी अगदी बिनचूक सांगत असा माझा स्वतःचा अनुभव आहे.' बाबासाहेब नेहमी भारतातील प्रमुख बूक डेपोतून, लायब्ररीतून तसेच जुन्या पुस्तक मार्केटमधून नित्यनेमाने ग्रंथ खरेदी करत.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथांसाठीचे राजगृह

पुण्याचे भांडारकर बूक डेपो बाबासाहेबांचे आवडीचे दुकान होते. बाबासाहेबांनी पुण्याच्या वास्तव्यात गोपाळ कृष्ण गोखले यांच्या 'सर्व्हन्ट्स सोसायटी ऑफ इंडिया'च्या वाचनालयात अभ्यास केला होता. रत्नागिरीच्या वास्तव्यात त्यांनी टिळक ज्ञान मंदिराला भेट दिली होती.

मुंबईच्या काळबादेवी परिसरात 'न्यू ॲण्ड सेकंडहॅण्ड' पुस्तकांच्या दुकानात अनेक वर्षे व्यवस्थापक म्हणून कार्यभार सांभाळणारे चंद्रकांत रामराव मानकामे नावाचे गृहस्थ हे बाबासाहेबांच्या पुस्तकप्रेमाचे एक साक्षीदार आहेत. १९४७ चा तो काळ असावा. मानकामे यांनी सांगितले की, 'एका प्रसंगी चार-पाच पुस्तकांचा गठ्ठा घेऊन मी बाहेर गेलो. बाहेर एका जुन्यापुराण्या गाडीत सुटाबुटात असलेली एक व्यक्ती बसली होती. गोरापान रंग, चेहऱ्यावर तेज असलेल्या त्या व्यक्तीला मी ती पुस्तके दिली आणि गाडी निघून गेल्यानंतर मी परत दुकानात आलो. दुकानात प्रवेश केल्यावर मालक म्हणाले, 'मानकामे तुला ठाऊक आहे ते कोण होते?' मी नकारार्थी मान हलवली. अरे ते बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांच्या विद्वत्तेची सर कोणालाही येणार नाही. ते एक महान व्यक्ती होते. त्यानंतर बाबासाहेब आमच्या दुकानात बऱ्याचदा आले.'

प्रोफेसराने असे सांगितले की, 'आंबेडकरांच्या पदव्यांपेक्षा त्यांची अभ्यास साधना दुप्पट होती. भीमरावांनी आपल्याला जो अभ्यासाचा अधाशीपणा दाखवला त्याला अमेरिकेत तोड नाही.' दुसऱ्या प्रोफेसराने सांगितले की, 'भीमरावांसारखा तेजस्वी दीप विद्यार्थी मी माझ्या आयुष्यात पाहिला नाही.'

पुढच्या अभ्यासक्रमासाठी आंबेडकरांनी लंडन विद्यापीठात प्रवेश घेतला आणि डी. एस्सी.साठी प्रबंध लिहिण्याचे ठरवले. त्यांनी 'लंडन पोलिटिकल स्कूल'मध्ये नाव दाखल केले. येथे ते नियमितपणे लायब्ररीत जात आणि आवडीचे ग्रंथराज आपल्या पुढ्यात घेत. लायब्ररीची दारे बंद होईपर्यंत ते दररोज १८-१८ तास अखंडपणे मनन, चिंतन करीत बसायचे. सकाळी ते खानावळीत मिळेल ते खायचे. पैशाच्या अभावी मैलोन्‌मैल पायीच भ्रमण करीत. दुपारी भोजनाच्याऐवजी वाचन करून समाधान मानायचे. दुर्लभ ग्रंथाच्या प्राप्तीसाठी ते वाचनालयात आग्रहाने विनंती करीत. आवडीचे ग्रंथ मिळावे म्हणून दुकाने शोधीत भटकंती करीत. उघडी दुकाने तपासीत. बंद झालेली दुकाने ठोठावीत आणि रात्र झाली की पुनश्च थोडासा आहार घेऊन रात्रभर अभ्यास करण्यात लीन व्हायचे. ही त्यांची तपश्चर्या ! अशी विद्येची आराधना डॉ. आंबेडकर करीत असत. या कठोर साधनेतून त्यांनी डी.एस्सी. पदवी प्राप्त केली.

## कर्मयोगी

डॉ. आंबेडकर विद्येचे खरे कर्मयोगी होते. 'Who were the Shudras and How they come to Fourth Varnas' हा संशोधनपर ग्रंथ लिहिण्याअगोदर त्यांनी मूळ ऋग्वेद दहा वेळा वाचला होता. स्वतःच्या कर्तृत्वावर ते संस्कृत भाषा शिकले. इंग्रजी भाषेवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. एकदा बाबासाहेबांच्या डोळ्यांना आजार जडला. डॉक्टरने त्यांना 'वाचन' बंद करण्यास सांगितले. याचे त्यांना इतके दुःख झाले की, डोळे अश्रूंनी ओलेचिंब झाले आणि म्हणाले, 'वाचन आहे तोपर्यंत माझे जीवन आहे. वाचन बंद झाले तर मी फार दिवस जगणार नाही.'

डॉ. आंबेडकर आपल्या ग्रंथप्रेमाविषयी सदोदित म्हणायचे की, 'पुस्तकांच्या सहवासात शांत आयुष्य वेचण्यासारखा दुसरा आनंद नाही. पुस्तके मला शिकवतात. नवी वाट दाखवतात म्हणून मला ती आनंदाचा लाभ करून देतात.' एकदा पंडित मदनमोहन मालवीयांनी बनारसच्या हिंदू विद्यापीठासाठी आंबेडकरांकडे ग्रंथाची मागणी करून पाच लाख रुपये देण्याची तयारी दर्शविली होती. परंतु डॉक्टर साहेबांनी सांगितले की, 'माझी पुस्तके माझ्यापासून तुम्ही दूर नेलीत म्हणजे माझा

प्राणच तुम्ही हिरावून नेलात असे होईल.'

एकदा कोलंबिया विद्यापीठाने बाबासाहेबांचे अभिनंदन करण्यासाठी आणि एल.एल.डी.ची पदवी बहाल करण्यासाठी आंबेडकरांना बोलावले. अमेरिकेत आंबेडकर थोडेसे आजारी पडले. तेव्हा मुंबईतील कॉलेजच्या प्राचार्याने आजाराविषयी त्यांना पत्र लिहिले. तेव्हा नव्याने प्रकाशित झालेल्या ग्रंथाची पार्सल मुंबईला आली होती. आंबेडकरांनी उत्तरात असे म्हटले की, 'मी येथून लवकरच भारतात परत येईन. ते ग्रंथ मला वाचावयाचे आहेत. ते माझ्या वाचनालयात आणून ठेवा एवढेच.' आपल्या आजाराविषयी एक शब्दसुद्धा त्यांनी पत्रात लिहिला नाही. एवढा विलक्षण ध्यास त्यांना ग्रंथांचा होता.

## ग्रंथाप्रति निष्ठा

डॉ. आंबेडकर मसुदा समितीचे अध्यक्ष असतानाचा प्रसंग. घटना तयार करण्यासाठी मौलिक इंग्रजी ग्रंथांचा बाबासाहेबांना चांगला उपयोग होईल असे वाटल्याने पंतप्रधान पंडित नेहरूंनी ग्रंथांची यादी बनवून ती बाबासाहेबांना पाठवली. ग्रंथ दुर्मीळ तर होतेच; पण जास्त किंमतीचे होते. यादी सोबतच पंडितजींनी ग्रंथांच्या किंमती एवढा एक धनादेशही पाठवला. बाबासाहेबांनी ग्रंथांची यादी वाचली व जोडलेला धनादेश पाहून आश्चर्य व्यक्त केले. पंडितजींनी पाठविलेल्या यादीवर मोकळ्या जागी बाबासाहेब लिहितात, 'पंडितजी, आपण आवर्जून उपयोगी अशा ग्रंथांची यादी व धनादेश पाठवलात, याबद्दल धन्यवाद! पण हे ग्रंथ आधीपासूनच माझ्याकडे आहेत. ग्रंथ महत्त्वाचे आहेत हे लक्षात आल्याने मी ते केव्हाच खरेदी केले आहेत.' ते पत्र व धनादेश बाबासाहेबांनी परत नेहरूंकडे पाठवून दिले. प्रसंग छोटा आहे; पण यातून बाबासाहेबांची ग्रंथाप्रति असलेली पराकोटीची निष्ठा व्यक्त होते.

## रेल्वे सलून

बाबासाहेबांचे सर्वाधिक आवडीचे ठिकाण म्हणजे रेल्वे सलून. 'पुस्तके वाचणे सोयीचे व्हावे' हा त्यामागचा उद्देश. बाबासाहेब २५ एप्रिल १९४८ रोजी उत्तर प्रदेशात भरलेल्या शे.का.फे.च्या अधिवेशनासाठी गेले होते. त्यावेळी उत्तर प्रदेशाच्या राज्यपाल सरोजिनी नायडू होत्या. बाबासाहेबांना घेण्याकरिता सरोजिनी नायडू रेल्वे स्टेशनवर पोहोचल्या. त्या बाबासाहेबांना म्हणाल्या, 'डॉक्टर साहेब, मी आपल्याला राजभवनात नेण्याकरिता आली आहे. आपण माझ्या निमंत्रणाचा स्वीकार करावा.' यावर बाबासाहेब नम्रपणे म्हणाले, 'ताई मी प्रवासाच्या काळात सलूनमध्ये राहूनच लेखन-वाचन करतो. कारण माझी प्राणप्रिय पुस्तके माझ्यासोबत राहतात. त्यांना सोडून मी कुठेही जाऊ शकत नाही. मी आपल्या या मित्रांशिवाय एक मिनिटसुद्धा आरामाने बसू शकत नाही. इतक्या मि त्रांना सोबत घेऊन मी आपल्या अतिथिगृहात कसा येऊ शकतो ?', नायडू म्हणाल्या, 'हे तर खरेच आहे बाबासाहेब ! मी जिथे-जिथे बघते तिथे तिथे आपल्या आवडत्या मित्रांचीच गर्दी आहे. आपला अभ्यास फार दांडगा आहे. भारत मातेला आपल्यासारख्या ज्ञानवंत सुपुत्राचा मोठा गर्व आहे.'

### व्यासंग




भूकंपाने उद्ध्वस्त झालेल्या नेपाळ देशातील काठमांडू शहरात भरलेल्या जागतिक बौद्ध परिषदेला ते आवर्जून उपस्थित होते. ही परिषद २० नोव्हेंबर १९५६ रोजी भरली होती. त्या प्रसंगाची आठवण सांगताना दै. 'बोधिसत्त्व'चे संपादक वि.रा. रणपिसे म्हणतात, वेळ सकाळची होती. नोव्हेंबरचा महिना आणि तोही नेपाळातला म्हणजे केवढी थंडी! आजूबाजूला हिमालयाची ती धवल व उत्तुंग शिखरे आणि त्यांच्या मध्यभागी काठमांडू शहर वसलेले. अशा कडक थंडीच्या एका सकाळी बाबासाहेबांसमवेत आम्ही काठमांडू शहरात विहाराला भेट दिली. विहाराजवळच शिल्पकलेचे प्रदर्शन भरले होते. त्यात तथागताच्या मूर्ती भव्य आणि आकर्षक होत्या. तथागतांच्या प्रत्येक मुद्रेबद्दल त्यांनी कार्यकर्त्यांकडून माहिती गोळा केली. विहारांतून बाहेर निघताना आम्हाला रस्त्याच्या डाव्या बाजूस 'पारमितांचा' ग्रंथसंग्रह नजरेस पडला. तो पाहण्यास आम्ही विसरलो नाही. नेपाळी व नेवारी भाषेतील हे विश्वोद्धारक बौद्ध साहित्य पाहताना बाबासाहेबांना अत्यानंद झाला. 'नेवारी भाषेतील बौद्धवाङ्मय विकत घेऊन भारतात ते आणावे' अशी त्यांची इच्छा होती.

राजकारण, समाजकारण, अस्पृश्योद्धार या क्षेत्रात तसेच देशाची घटना लिहिण्यासारखे अतुलनीय कार्य करतानाही बाबासाहेबांनी वाचनाचा व्यासंग जोपासला होता. ज्ञानाची प्राप्ती व विचार समृद्ध करणाऱ्या उपयुक्त अशा ग्रंथांना बाबासाहेबांनी आयुष्यभर हृदयाशी कवटाळले. 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथावरून शेवटचा हळुवार हात फिरवून अंतिम श्वास घेतला.

मुंबई उच्च न्यायालयात वकिली करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे निष्णात वकील होते. अतिशय विद्वान बॅरिस्टर म्हणून नावारूपास आले होते. त्यांनी आपल्या विद्वत्ताप्रचुर युक्तिवादाने अनेकांच्या जीवनात सुख व आनंदाची ज्योत प्रज्वलित करीत न्याय मिळवून दिला.

# निष्णात



प्रभाकर ओव्हाळ

क्रांतिसूर्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'भारतीय घटनेचे शिल्पकार अन् पददलितांचे प्राण' म्हणून अखिल विश्वात लौकिक आहे. इंग्लंड, अमेरिका येथील जगप्रसिद्ध विद्यापीठात बाबासाहेबांचे विचारशिल्प आहे. श्रीलंकेत मधुरनकुलिया येथील 'डॉ. आंबेडकर कम्युनिटी सेंटर'मधून त्यांच्या विचारांचा प्रसार-प्रचार होत आहे. भारतातील राष्ट्रीय पुरुषांपैकी डॉ. आंबेडकर यांचे पहिलेच शिल्प जपान देशाची प्राचीन धम्मभूमी समजल्या जाणाऱ्या कोयासन येथे साकारत आहे.

बाबासाहेब हे एक उत्तम वकील होते. उलटतपासात त्यांनी अनेकांची भंबेरी उडवली होती. खटल्यातील सत्य न्यायालयासमोर उघड करून अनेक गरजू लोकांना त्यांनी न्याय मिळवून दिला. कोर्टात कोणतीही केस चालविताना, त्या केसचा अभ्यास केल्याशिवाय ते चालवीत नसत. त्यासाठी जागरण करण्यासही त्यांची तयारी असे. त्यांच्या हाताखालचे वकील जागरणासाठी नेहमी कंटाळून जात. अभ्यासपूर्वक केस चालवल्यामुळे अनेक न्यायाधीशांनी आपल्या निकालपत्रात त्यांच्याबद्दल प्रशंसोद्‌गार काढले आहेत. विलक्षण कुशाग्रबुद्धी व इंग्रजीवरील असामान्य प्रभुत्वामुळे न्यायाधीशसुद्धा त्यांचा युक्तिवाद ऐकताना दंग होऊन जायचे. मुंबई उच्च न्यायालयात वकिली करणारे डॉ. आंबेडकर एक निष्णात बॅरिस्टर म्हणून नावारूपास आले होते.

### कटू अनुभव

बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने महाराष्ट्रातील अनेक न्यायालये पावन

### न्यायालयीन लढाईचा शुभारंभ

नाशिक येथील फर्स्टक्लास सबजज्ज पंडित म्हणाले होते, 'आज माझ्या कोर्टात मुंबईचा एक तरुण बॅरिस्टर आला होता. त्याने आपले काम म्हणजे साक्षीदारांची तपासणी, उलट तपासणी फार उत्तम मुद्देसूद व कौशल्यपूर्ण अशी केली. हा माणूस मोठा मेहनती, विद्वान व उमदा दिसला.' पुढे याच नाशिक शहरातून बाबासाहेबांना सप्टेंबर १९२३ साली पुंजाजी लक्ष्मण जाधव (आडगाव, जि. नाशिक) यांच्या वकिलीची पहिली केस मिळाली. बाबासाहेबांच्या जीवनात पहिल्यांदाच न्यायालयीन लढाईचा शुभारंभ झाला. जाधव यांचे वडिलोपार्जित शेत एका मारवाड्याकडे गहाण होते. बाबासाहेबांनी ते शेत जाधव यांना परत मिळवून दिले.

झाली आहेत. बाबासाहेबांनी सामाजिक भावनेने अनेक खटले लढले. लंडन येथे बॅरिस्टरचे शिक्षण घेताना बाबासाहेबांना अतोनात त्रास झाला. बॅरिस्टर बनून ज्या वेळी ते भारतात आले आणि मुंबई उच्च न्यायालयात वकिली करू लागले तेव्हा त्यांना अस्पृश्यतेचा कटू अनुभव आला. बार लायब्ररीत ते ज्या टेबलावर बसत तेथे उच्चभ्रू समाजातील वकील फिरकत नव्हते.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रातील उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू पाहिले की कुणीही आश्चर्याने थक्क व्हावे. जेव्हा बाबासाहेब बॅरिस्टर बनून भारतात आले तेव्हा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांची रथातून प्रचंड मिरवणूक काढली होती. बाबासाहेबांचे वास्तव्य त्या वेळी परळच्या डबक चाळीत होते. येथेसुद्धा शाहू महाराज बाबासाहेबांचे अभिनंदन करण्यासाठी आले होते. एक बॅरिस्टर झालेला विद्वान अशा साध्या चाळीत राहत असलेला पाहून महाराजांनी आश्चर्य व्यक्त करत बाबासाहेबांना म्हटले. 'बाबासाहेब, आपण या चाळीत राहून केवढे मोठे झाला आहात! याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.' यावर बाबासाहेब म्हणाले, 'या चाळीत राहून मुलाबाळांनी गजबजलेल्या घरात मी एवढा अभ्यास केला आहे. मला कुटुंबाची अथवा मुलांची मुळीच अडचण निर्माण झाली नाही. मी एकदा का अभ्यासात मग्न झालो की माझ्या कानाला कोणतीच गोष्ट ऐकू येत नाही.'

### भेदक उलट तपासणी

ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी शंकरराव मोरे व शंकरराव जेधे यांनी पुणे येथे केलेल्या भाषणात थोर विचारवंत अण्णासाहेब भोपटकर यांच्यावर कडक शब्दात टीका केली होती. भोपटकरांनी याबाबत पुणे न्यायालयात मोरे व जेधे यांच्याविरुद्ध खटला दाखल केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शंकरराव मोरे व शंकरराव जेधे यांच्यात तीव्र राजकीय वैमनस्य होते. तरीही त्यांनी आपले वकीलपत्र आंबेडकरांना दिले. सुनावणीच्या दिवशी आंबेडकरांनी भोपटकरांची भेदक उलटतपासणी केली. उत्तरे देताना भोपटकरांना घाम फुटला आणि त्यांची दमछाक उडाली. त्यांचा उलटतपास अपूर्ण राहिला. त्यांनी पुढील तारीख घेतली. अण्णासाहेब भोपटकर हे महाराष्ट्रातील नामवंत ज्येष्ठ विचारवंत. त्यांची एवढी गळचेपी झाली की, त्यांनी पुढील तारखेस खटलाच काढून घेतला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ठाणे कोर्टात उपस्थित राहून चार खटले लढवले होते. विशेष म्हणजे पनवेल तालुक्यातील चिरनेर सत्याग्रहात अटक झालेल्या ब्राह्मण आरोपीची बाजू बाबासाहेबांनी मांडली होती. तर हत्येच्या आरोपातील आठ जणांची बाजू मांडून त्यांची आरोपातून मुक्तता केली होती.

### निर्दोष मुक्तता

महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहात पाच आरोपींना आलिबाग कोर्टाने दोषी ठरवत चार महिने सक्तमजुरीची शिक्षा सुनावली होती. त्या प्रकरणातील अपील ठाणे कोर्टात केले. त्याचा युक्तिवाद करण्यासाठी प्रथम २४ सप्टेंबर १९२७ रोजी बाबासाहेब ठाण्यात आले होते. मात्र जिल्हा कोर्टाने खालच्या कोर्टाचा निर्णय कायम ठेवला. वसई माणिकपूर येथील शेतकरी मेले अलेप डिब्रेट, शुक्रीया आलाइस फन्सीस, बास्कीयो दमेल आणि जेसुलुसा हा शिक्षक यांच्यावरील हत्येचा खटला ठाणे कोर्टात सुरू होता. त्यांची बाजू मांडण्यासाठी १३ ऑक्टोबर १९२८ रोजी डॉ. आंबेडकर ठाणे कोर्टात आले होते. या खटल्यात सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाली होती.

### फाशी टळली

होटगी (सोलापूर) येथील शिवप्पा पाटलांची फाशीची शिक्षा

बाबासाहेबांमुळे टळली होती. घटना १९३६ सालची आहे. माजी आमदार गुरुनाथ पाटील यांचे बंधू सिद्धामप्पा पाटील यांनी सांगितले, 'एका खूनप्रकरणी इंग्रजांनी वडिलांना फाशीची शिक्षा ठोठावली होती. केवळ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच त्यांची त्यातून निर्दोष सुटका होऊ शकली आणि आमच्या पाटील घराण्याची वंशवेल बहरू शकली. त्यामुळे आजही आमच्या घराण्यात देवदेवतांच्या पूजेआधी बाबासाहेबांच्या प्रतिमेची पूजा होते. गेल्या ७२ वर्षांपासून ही परंपरा आम्ही जपली आहे.'

हा खटला डॉ. आंबेडकर लढवणार असल्याचा विषय त्या वेळी चर्चेचा बनला होता. बाबासाहेबांना पाहण्यासाठी आणि त्यांचा युक्तिवाद ऐकण्यासाठी विजापूर न्यायालयाच्या परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. वडिलांची सुटका झाल्यानंतर माझे बंधू गुरुनाथ, बहीण हिराबाई व माझा जन्म झाला. अन्यथा आम्ही हे जगही पाहिले नसते. पुढे गुरुनाथ आमदार झाला. पाटील घराण्याने राजकीय क्षेत्रात नावलौकिक कमावला तो फक्त बाबासाहेबांमुळेच. आम्ही त्यांच्या उपकाराची परतफेड करू शकत नाही. बाबासाहेबांच्या रूपाने आमच्या पाटील कुटुंबासाठी देवच धावून आला. आम्ही त्यांना देवासमानच मानतो. १४ एप्रिल जयंतीदिनीही सर्व कुटुंबीय एकत्र गोळा होऊन त्यांच्या प्रतिमेचे पूजन करतो.


## विद्वत्ताप्रचुर युक्तिवाद

नागपूर हायकोर्टात बाबासाहेब १९४० साली बाबा मुक्तावनदास यांची केस लढण्यासाठी आले होते. कोर्टाने बाबा मुक्तावनदासला फाशीची शिक्षा सुनावली होती. ज्या दिवशी नागपूर हायकोर्टात ही केस सुरू होती, त्या दिवशी सारा परिसर बाबासाहेबांना पाहण्यासाठी आणि त्यांचा विद्वत्ताप्रचूर युक्तीवाद ऐकण्यासाठी गोळा झाला होता. यावेळी हायकोर्टात पाय ठेवायलाही जागा शिल्लक नव्हती. जनतेची प्रचंड गर्दी पाहून बाबासाहेब म्हणाले, 'ही राजकीय सभा नसून न्यायालय आहे.' बाबासाहेबांमुळेच बाबा मुक्तावनदास निर्दोष मुक्त झाले. त्यांची फाशीची शिक्षा रद्द झाली.

साधारणतः १९५० ची घटना आहे. मुंबई स्टेशन (सध्याचे नाव छत्रपती शिवाजी टर्मिनल्स) येथे बंसीलाल बाबू रामटेके यांची टिकिट कलेक्टर म्हणून नियुक्ती झाली होती. बंसीलाल मूळचे राजनांदगाव येथील रहिवासी होते. बंसीलाल एका आरोपाखाली जेलमध्ये गेले होते. बाबासाहेबांनी बंसीलालची केस हाती घेतली. ते त्यांना तुरुंगात भेटायला गेले. बाबासाहेब बंसीलालला म्हणाले, 'मी तुला या आरोपातून मुक्त करतो. माझी फी फार आहे. तू काय देणार आहेस.' यावर बंसीलालचे उत्तर होते, 'बाबासाहेब तुमच्यासाठी मी हा जीवही द्यावयास तयार आहे.' बाबासाहेब म्हणाले, 'जीव नको. हा जीव बुद्धधम्म च्या प्रचार-प्रसारासाठी लाव.' बंसीलालने पुढे नोकरी सोडून धम्मप्रचाराच्या कार्याला वाहून घेतले. डॉ. आंबेडकर जयंती, बुद्ध जयंतीला ते हत्तीवर फोटो ठेवून मिरवणूक काढीत.

## मदतीचा हात

बाबासाहेबांनी दक्षिण साताऱ्यातील मिरज तालुक्यातील नांगोळे गावातील लिंगूबाई या निराधार विधवेला मदतीचा हात दिला. मारूती लांडगे या आपल्या पतीसोबत लिंगूबाई मुंबईत वास्तव्यास असताना श्री लांडगे यांचा अकस्मात मृत्यू होतो. लिंगूबाई बाबासाहेबांना भेटण्यासाठी राजगृहात जातात. ज्या कंपनीत लिंगूबाईचे पती नोकरीला असतात त्या कंपनीवर बाबासाहेब केस टाकतात. ज्या दिवशी कोर्टात केस सुरू असते त्या दिवशी लिंगूबाईचे अडीच वर्षाचे बाळ आजारी पडते.



लिंगूबाई बाळाला बाबासाहेबांचा चरणकमलावर ठेवून पोटतिडकीने विनवणी करते. 'बाबासाहेब, माझ्या बाळाला वाचवा..., हा बाळ माझ्या कुटुंबाचा कुलदीपक आहे.' यावर बाबासाहेब म्हणतात, 'लिंगूबाई हा बाळ तुझ्या कुटुंबाचा कुलदीपक असला तरी तो माझ्या रंजल्या-गांजल्या समाजाचा अंकुर आहे.' बाबासाहेब बाळाला मायेच्या ओलाव्याने गोंजारतात. डोक्यावरून हळुवार हात फिरवतात. तोंडाला दुधाची बाटली लावतात. बाबासाहेबांनी आपले सर्वस्व पणाला लावून लिंगूबाईला ही केस जिंकून दिली. तिला न्याय मिळवून दिला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या असंख्य अनुयायांनी देशभर विहारे, स्मृतिस्थळे उभारली. विहारात, स्मारकाशेजारी बाबासाहेबांच्या अस्थिकलशाची विधिवत स्थापना केली. भारतात अनेक ठिकाणी बाबासाहेबांच्या अस्थी आहेत. त्या स्थळांचा प्रवास थक्क करणारा असून बाबासाहेबांच्या उदात्त विचाराशी एकजीव होणारा आहे.**




# बाबासाहेबांची अस्थिस्थळे

**मिलिंद मानकर**

६ डिसेंबर १९५६, भारतीय बौद्धांच्या जीवनातील शोकाकुल दिवस. याच दिवशी गोरगरीब दलितांचे तारणहार, कोटी कोटी जनांचे उद्धारकर्ते, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. यावेळी भारतातीलच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरील नेत्यांनी, समाजसुधारकांनी बाबासाहेबांना श्रद्धांजली वाहिली. 'भारतातील हिंदू समाजातल्या अनिष्ट रूढींविरुद्ध केलेल्या बंडाचे प्रतीक' असे गौरवोद्‌गार पंडित नेहरूंनी लोकसभेत काढले.

बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण राजधानी दिल्लीत झाले तर अंत्यसंस्कार मुंबईला झाले. त्यांच्या 'राजगृह' या निवासस्थानातून मुंबईच्या इतिहासात 'न भूतो न भविष्यति' अशी अंतिम महाप्रयाण यात्रा निघाली. देशाच्या कानाकोपऱ्यांतून लाखो अनुयायी महाप्रयाण यात्रेत सहभागी झाले होते. जो तो 'बाबा... बाबा...' म्हणून हंबरडा फोडत धाय मोकलून रडत होता. पाषाणालादेखील पाझर फुटावा असा तो हृदयस्पर्शी निर्वाणसोहळा होता. चौपाटीवरील दादर स्मशानभूमीत बाबासाहेबांच्या पार्थिवाला चिरंजीव भय्यासाहेबांनी ७ डिसेंबर १९५६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता अग्नी दिला.

महाप्रयाण यात्रेत सहभागी झालेल्या काही भीमानुयायांनी अपार श्रद्धा आणि निष्ठेपोटी बाबासाहेबांना काव्यसुमनांची श्रद्धांजली अर्पण केली, कुणी महापरिनिर्वाणावर पोवाडा लिहिला, कुणी राख भाळी लावली तर कुणी मूठभर अस्थी गोळा केल्या.

महाकारुणिक तथागत बुद्धांचे जेव्हा महापरिनिर्वाण झाले तेव्हा त्यांच्या अस्थीचे सारखे आठ भाग करण्यात आले. त्यावर स्तूप उभारण्यात आले. कालांतराने प्रियदर्शी सम्राट अशोकाने संपूर्ण भारतात ८४,००० स्तूप, विहारे उभारल्याचा ऐतिहासिक दाखला आहे. अशोकाचा तोच आदर्श, तीच प्रेरणा समोर ठेवून आधुनिक युगात बाबासाहेबांच्या असंख्य अनुयायांनी देशभर विहारे, स्मृतिस्थळे उभारली. विहारात, स्मारकाशेजारी बाबासाहेबांच्या पवित्र अस्थिकलशाची विधिवत स्थापना केली. भारतात अनेक ठिकाणी बाबासाहेबांच्या अस्थी आहेत. त्या स्थळांचा प्रवास थक्क करणारा असून बाबासाहेबांच्या उदात्त विचारांशी एकजीव होणारा आहे. ६ डिसेंबरला चैत्यभूमीवर जाणे सर्वांनाच शक्य होत नाही. जवळच्याच स्मृतिस्थळाला भेट देऊन बाबासाहेबांप्रतिचा आदरभाव व्यक्त करता येणे शक्य आहे.

### चैत्यभूमी

'चैत्यभूमी' एक स्तूप असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मृतिस्थळ आहे. याच ठिकाणी बाबासाहेबांवर अत्यंसंस्कार झाले होते. 'स्तूप' म्हणजे बौद्धशिल्प स्मारक आहे. बौद्ध बांधवांचे विहार म्हटले जाते. चैत्य हे मृत

व्यक्तींसाठी बांधले जाते. महान व्यक्तीच्या अस्थी जमिनीत पुरून त्यावर दगड व मातीचा ढिगारा रचला जातो. त्या जागेवर त्या व्यक्तीची आठवण म्हणून 'स्तूप' बांधले जातात. मुंबईच्या चैत्यभूमीच्या प्रवेशद्वारावर 'अशोकस्तंभ' असून चैत्यभूमीवरील स्तुपाच्या आतील भागात बुद्ध व बाबासाहेबांच्या मूर्ती बसवल्या आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी चैत्यभूमीवरील स्तुपाच्या स्मारकाचे एक ज्योत प्रज्वलित करून उद्घाटन केले. दादासाहेब गायकवाड यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या अस्थी कलशाची स्थापना स्तुपात करण्यात आली.

चैत्यभूमी स्मारकाच्या चारही बाजूस दोन फूट व्यासाचे चार स्तंभ उभारण्यात आले आहेत. स्मारकाच्या पायाखाली जमिनीत रॅनफोर्ल्ड सिमेंट कॉंक्रिटचे खांब घातले असून त्यावर '५ फूट ३' उंचीचा चौथरा उभारण्यात आला. या चौथऱ्यावर चोहोबाजूस सहा फूट जागा मोकळी सोडून स्तूपाच्या आकाराच्या २२ फूट उंच व २८ फूट व्यासाचा सुंदर घुमट आहे. घुमटावर छोटीशी छत्री ठेवण्यात आली आहे. यासाठी काळा १ चौ. फूट घडीव व रेखीव पिवळा दगड वापरण्यात आला. घुमटासमोरील द्वार सांचीच्या स्तुपाप्रमाणे ठेवण्यात आले आहे. तसेच घुमटाच्या आत मध्यावर (चौथऱ्यावर) ८ फूट उंचीचा भरीव स्तूप व त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी ठेवण्यात आल्या आहेत.



## आंबडवे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबडवे! आंबेडकरी जनतेचेच नव्हे तर फुले-शाहू आंबेडकर चळवळीतील सर्वांचेच आणि तमाम भारतीयांचे एक स्फूर्ती व प्रेरणास्थान बनले आहे. आज ज्या ठिकाणी डॉ. आंबेडकरांचे स्मारक आहे त्या ठिकाणी एका कोपऱ्यात दहा बाय पंधरा हात लांबीच्या मातीच्या भिंती व गवताचे छप्पर असलेले त्यांचे वडिलोपार्जित घर होते. त्याच ठिकाणी या स्मारकाच्या तेवढ्याच आकाराच्या एका खोलीत डॉ. बाबासाहेब यांचा पुतळा बसविण्यात आला असून त्या ठिकाणी त्यांचा अस्थिकलश ठेवण्यात आला आहे. बाबासाहेबांचे सुपुत्र यशवंत उर्फ भय्यासाहेब आंबडवे गावात येत. फेब्रुवारी १९६२ रोजी त्यांनी आपल्या मूळ घरासमोर छोटासा बुद्धविहार बांधला. बाबासाहेबांच्या या मूळ भूमीचे दर्शन घेण्यासाठी, त्या भूमीची माती मस्तकी लावून या भूमीला अभिवादन करण्यासाठी दरदिवशी महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यांतून दलित बांधव व आंबेडकरी चळवळीतील लोक येत असतात.

## सिद्ध पिंप्री

नाशिकच्या आडगावातील भूमिपुत्र परेश लहानुजी लोखंडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अंगरक्षक होते. त्यामुळे बाबासाहेबांचा स्पर्श सिद्ध प्रिंपीला लाभला. डॉ. बाबासाहेबांबद्दल एक हृदयस्पर्शी आठवण आवर्जून सांगितली जाते. बाबासाहेब एकदा पिंप्रीतील राजवाड्यात सभेसाठी आले होते. तेव्हा सभेच्या ठिकाणी त्यांना कोठे बसवायचे हा ऐनवेळी प्रश्न निर्माण झाला. गावात कोणाकडेच खुर्ची नव्हती. अखेर गावातील शिंपी मुनीर चांदभाई यांच्याकडे असलेली खुर्ची बाबासाहेबांसाठी आणली गेली व सभा व्यवस्थित पार पडली. मुनीर चांदभाईने ही खुर्ची बाबासाहेबांची आठवण म्हणून जपून ठेवली.

लोखंडे यांनी बाबासाहेबांच्या अंत्यविधीनंतर अस्थी सिद्ध प्रिंपीत आणल्या. अस्थी आणल्यावर लोखंडे गावकऱ्यांना म्हणाले, 'इथे आपणाला बाबासाहेबांचा स्तूप तयार करावयाचा आहे.' गावकऱ्यांनी त्यांच्या विनंतीला मान दिला. ग्रामस्थांनी लोकवर्गणीद्वारे ३० मे १९५८ रोजी स्तूप उभारला. हा स्तूप उभारण्यासाठी परेश लोखंडेसोबत तत्कालीन समाजसेवक पोलीस पाटील हाडकू जाधव, सरपंच मुरलीधर लोखंडे, दामोजी निकम, रामभाऊ जाधव, बाबुराव लोखंडे, जंगल लोखंडे, बाबुराव निकम, अर्जुन निकम, कोंडाजी लोखंडे, नागेश लोखंडे, रावबा लोखंडे, गणपतराव लोखंडे, अनाजी लोखंडे, नामदेव लोखंडे यांचेही योगदान आहे. गावकऱ्यांनी उभारलेला बाबासाहेबांचा हा देशातील पहिलाच स्तूप आहे. या स्तुपात बाबासाहेबांच्या अस्थी चांदीच्या डबीत ठेवण्यात आल्या आहेत. दरवर्षी सिद्ध प्रिंपीत ३० मे रोजी स्तूपदिन साजरा केला जातो. ६ डिसेंबरला ज्यांना मुंबईच्या चैत्यभूमीवर जाणे शक्य होत नाही ते हजारोंच्या संख्येने येथे दर्शनासाठी येतात.



सिद्ध पिंप्री (नाशिक) येथील राष्ट्रीय स्मारक स्तूप.



## दीक्षाभूमी

लाखो दुःखित जीवांना जगण्याची नवी ऊर्जा देणारे क्रांतिस्थळ म्हणून नागपूरच्या दीक्षाभूमीचा लौकिक आहे. याच भूमीवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी 'धम्मचक्र'' गतिमान केले होते. ब्रह्मदेशाचे महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते बाबासाहेबांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. उपस्थित जनसमुदायाला बाबासाहेबांनी तिसरण, पंचशील आणि २२ प्रतिज्ञा दिल्या. त्या वेळी 'बाबासाहेब करे पुकार, बौद्धधम्म का करो स्वीकार' या गगनभेदी घोषणांनी सारा आसमंत निनादला होता. कालांतराने तीन कोटी रुपये खर्चून दीक्षाभूमीवर देशातील सर्वात मोठा स्तूप उभारण्यात आला. स्तूपाची उंची १२० फूट आहे. प्रख्यात शिल्पकार शिवदानमल यांची भूमिका महत्त्वाची आहे. स्तुपाच्या चारही दिशेला जगप्रसिद्ध सांची स्तुपासारखे तोरणद्वार उभारले आहेत. स्तुपाचा कोनशिला समारंभ जून १९७८ मध्ये जागतिक बौद्ध परिषदेचे अध्यक्ष भदन्त आलबर्ट एडिरेसिंगे (श्रीलंका) यांचे हस्ते झाला. दीक्षाभूमीवरील आंबेडकर स्मारकाचा पाया कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी रचला तर रा.सु. गवई यांनी कळस चढवला. दरवर्षी विजयादशमीला नागपुरात धम्मचक' प्रवर्तन दिन साजरा होतो. दीक्षाभूमीच्या मध्यवर्ती स्मारकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी ठेवण्यात आल्या आहेत. स्मारक समितीचे अध्यक्ष रा.सु. गवई यांच्या हस्ते ही प्रतिष्ठापना झाली. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त बाबासाहेबांच्या या अस्थी सिद्धार्थ कॉलेज मुंबईतर्फे स्मारक समितीला मिळाल्या.

## अभिवादन भूमी

डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणा-नंतर त्यांच्या अस्थी अनुयायांनी सोबत घेतल्या. त्यांची श्रद्धापूर्वक जपणूक केली. त्यापैकी सांगली जिल्ह्यातील एक गाव आरग होय. ६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांच्या अस्थी आरग गावात आल्या. त्या काळी गावातील अनेक दलित तरुण तमाशात तसेच समता सैनिक दलात काम करायचे. महापरिनिर्वाणादिवशीही काही जण तमाशाच्या निमित्ताने मुंबईत होते. त्यांनी समतादलाच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या अस्थी मिळवण्याचा प्रयत्न केला. त्या काही दिवसांनी मिळतील असे सांगण्यात आले. त्यानुसार सांगलीत बापट वसतिगृहात काही दिवसांनी अस्थीचे पार्सल टपालाद्वारे आले. आरगात बौद्ध वसाहतीत एका छोट्या विहारात कलशामध्ये बाबासाहेबांच्या अस्थी ठेवण्यात आल्या. त्यांची नियमित जपणूक व पूजा-अर्चा सुरू झाली. १९९४-९५ मध्ये बौद्ध भिक्खूंचा एक जत्था गावात आला होता. जमिनीखाली अस्थी असताना वर उभे राहून पूजा-अर्चा योग्य नव्हे असे त्यांनी सांगितले. त्यांच्या सूचनेनुसार विहार बांधण्याचे ठरले. ६ डिसेंबर १९९५ रोजी जिल्हा भरातील हजारो अनुयायांच्या उपस्थितीत अस्थी बाहेर काढण्यात आल्या. दर्शनार्थ ठेवल्या. या परिसराचे नामकरण 'अभिवादन भूमी' केले. सध्या शेजारीच एका हॉलमध्ये चौथऱ्यात कलशामध्ये अस्थी ठेवल्या आहेत.



## प्रतिचैत्यभूमी

सातारा जिल्ह्यातील फलटण गावाला बाबासाहेबांचा पदस्पर्श झाला. २३ एप्रिल १९३९ रोजी बाबासाहेबांची फलटण येथे 'प्रजा परिषद' झाली. दुपारी बाबासाहेबांनी राजवाड्यात श्रीमंत मालोजीराव निंबाळकर यांची भेट घेतली. या परिषदेच्या प्रत्यक्षदर्शी प्रख्यात लेखिका बेबीताई कांबळे म्हणतात, ''माझ्या दादू आज्याने ते स्वयंसेवक असल्यामुळे मला बाबांचं जवळून दर्शन झालं. मोटरीच दार उघडलं आणि बाबाचं पाऊल फलटणच्या धरतीवर पडलं. तसं मी बुटावर डोकं ठेवलं. वर पाहिलं तर ती बाबांची भव्यदिव्य मूर्ती.''

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर फलटण तालुक्यातील निंभोरे या गावचे रहिवासी सीताराम पिराजी कांबळे, रामू कांबळे, शिवराम कांबळे हे बाबासाहेबांच्या अंत्ययात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी

मुंबईला गेले होते. त्यावेळी त्यांनी बाबासाहेबांच्या काही अस्थी आपल्या गावी आणल्या. हे बहुतांश जिल्ह्यातील भीम अनुयायांना माहीत नव्हते. गावातील उत्साही तरुण मंडळींनी याबाबत जनजागृती केली. या ठिकाणी बुद्ध विहार उभारला. विहारातील भिंतीवर बुद्ध आणि बाबासाहेबांची छायाचित्रे रेखाटली. चबुतरा उभारला. त्यावर तथागताची ध्यानस्थ प्रतिमा विराजमान आहे. बाजुला जाडजूड स्तंभ आहेत. या विहाराच्या छताला स्टील धातूच्या कुंभात बाबासाहेबांचा अस्थिकलश टांगला आहे. ज्यांनी बाबासाहेबांच्या अस्थी निंभोरे गावी आणल्या त्या सीताराम पिराजी कांबळे यांचेही छायाचित्र विहारात लावले आहे.

बाबासाहेबांच्या अस्थी दरवर्षी ६ डिसेंबरला जनतेच्या दर्शनासाठी ठेवल्या जातात. २०१० साली ६ डिसेंबरला तालुक्यातील विविध गावातील भीमसैनिकांनी निंभोरे गावापर्यंत अभिवादन रॅली काढून अस्थिकलशाचे दर्शन घेतले. त्यावेळी विविध संघटनांनी एकत्रित येऊन दरवर्षी महापरिनिर्वाणदिनी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी निंभोरे येथे येण्याचा संकल्प जाहीर केला. तेव्हापासून निंभोरे हे गाव 'प्रतिचैत्यभूमी' म्हणून नावारूपास आले आहे.

## अंकलखोप

अंकलखोप (जि. सांगली) येथे बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थी आहेत. ज्यांनी बाबासाहेबांच्या सभेचे अंकलखोप येथे आयोजन केले होते, ते गणपत लांडगे (आबा) यांच्यासोबत याच ठिकाणी बाबासाहेबांनी भाजी-भाकरी खाऊन जनसमुदायाला मार्गदर्शन केले होते.

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या चार निष्ठावान अनुयायांनी मुंबईहून रक्षाविसर्जनवेळी त्यांच्या अस्थी आणल्या व अंकलखोप येथे स्मृतिस्थळ बांधले. या अस्थिकलशाची पूजा १९५७ साली यशवंतराव उर्फ भय्यासाहेब आंबेडकर, दादासाहेब रूपवते, बी.सी. कांबळे, पी. टी. मधाळे, आवळे बाबू आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यांची नावे एका फरशीवर कोरली आहेत. प्रबुद्ध मंडळ अंकलखोप यांनी ही फरशी २४ नोव्हेंबर २००१ रोजी अर्पण केली.

१९३२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या ठिकाणी सभा घेतली होती. तत्पूर्वी १९२९ रोजी बाबासाहेबांनी


अंकलखोप

पेठ (ता. वाळवा जि. सांगली) येथेही सभा घेतली आहे. सध्या या ठिकाणी असलेले बुद्धविहार धम्म चळवळीचे नवीन ऊर्जास्थान बनले आहे. बुद्धविहार लोकवर्गणीतून बांधण्यात आले आहे.

## चैत्य स्मारक

मौजे पानगांव (ता. रेणापूर, जि. लातूर) येथील नागरिकांना बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणाची वार्ता ६ डिसेंबरला रेडिओवरून कळली. बातमी ऐकताच दगडू धोंडिबा आचार्य, किशन लक्ष्मण




आचार्य, यादव मुगाजी आचार्य, संतराम इराप्पा आचार्य, वैजनाथ कोंडिबा आचार्य, प्रभाकर रामराव आचार्य, सूर्यभान माधव आचार्य ही तरुण मंडळी मुंबईकडे रवाना झाली.

७ डिसेंबरला सकाळी रक्षा विधीचा (राखेचा) कार्यक्रम असल्याने व नंतर आपणास गर्दीत मिळणेही अवघड होईल असा विचार करून सर्व पानगांवकर मंडळी अंत्यसंस्काराच्या ठिकाणी अस्थीचे दर्शन घेण्याकरिता निघाले. तेथे गेल्यावर सर्वांनी गुडघे टेकून आपल्या उद्धारकर्त्याला अखेरचे त्रिवार वंदन केले. बाबासाहेबांच्या अस्थीचा टिळा कपाळी लावला. यातील लिंबाजी नावाच्या व्यक्तिने इतरांची नजर चुकवून पुन्हा राखेत हात घालून मुठीत जेवढी राख बसेल तेवढी घेतली. मूठ न उघडताच तसेच उभे राहून खिशात मूठ धरून तेथून निघाला. समुद्रकिनाऱ्यावर येऊन खिशातील गमचा (रूमाल) स्वच्छ धुवून त्या अस्थी त्यात बांधून खिशात ठेवल्या.

आपल्या मुक्तिदात्याच्या पवित्र अस्थी सोबत घेऊन ही मंडळी परतीचा प्रवास करून पानगावात आली. गावकऱ्यांनी विचारले, 'तुम्हाला बाबांचे दर्शन घडले का!' असे विचारताच लिंबाजीने सोबत रूमालात बांधून आणलेल्या अस्थी सर्वांना दाखविल्या. सर्वांनी त्या अस्थीचे दर्शन घेऊन कपाटी टिळा लावला व लिंबाजीने आपल्या कोपटाच्या आडूला (झोपडी) बांधून ठेवल्या.

१२ डिसेंबर १९५६ रोजी पुन्हा सर्वजण एकत्र आले. त्या अस्थी कुडाला बांधून न ठेवता त्या कुठेतरी जतन करून ठेवाव्यात, असे तेव्हा ठरवण्यात आले. त्यामुळे मातीचे मडके, नवा पांढरा कपडा आणला. त्या मातीच्या मडक्यात पांढऱ्या कपड्यात या अस्थी टाकण्यात आल्या. मेणकापडाच्या पिशवीत गुंडाळण्यात आल्या. तीन फूट खोल खड्ड्यात चहुबाजुंनी दगडाची कोप करून ठेवल्या. त्या आजपर्यंत त्याच अवस्थेत आहेत.



मूकनायक

काय करूं आतां धरूनियां भीड । निःशंक हें तोंड वाजविलें ॥
नव्हे जगीं कोणी मुकीयांचा जाण । सार्थक लाजून नव्हे हित ॥

वर्ष १ लें. ] मुंबई, शनिवार ता. १४ फेब्रुवारी १९२०. [ अंक २ रा.

मूकनायक.

स्वराज्याची सर सुराज्याला नाहीं !

महेंद्र गायकवाड

# ‘मूकनायक’ची शताब्दी

**‘मूकनायक’ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढलेले पहिले पाक्षिक. शंभर वर्षांपूर्वी एखादे वृत्तपत्र, मासिक, नियतकालिक अथवा पाक्षिकसुद्धा काढणे ही अत्यंत अवघड बाब होती. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘मूकनायक’ पाक्षिक काढले. ती अस्पृश्य समाजाची गरज होती. ‘मूकनायक’ काढणे अपरिहार्य होते. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्यांच्या व्यथा-वेदनांना वाचा फोडायची होती.**

देशातील अस्पृश्यांची दशा पालटण्यासाठी, त्यांच्या कामाला दिशा देण्यासाठी व त्यांचे अस्तित्व व अस्मिता जागवण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘मूकनायक’ पाक्षिकाचा पहिला अंक शनिवार ३१ जानेवारी १९२० रोजी काढला. त्याचा रजि. नं. बी-१४३० असा होता. हे पाक्षिक १४ हरारवाला बिल्डिंग, पोयबावडी, परेल, मुंबई या कार्यालयातून प्रकाशित होत असे. ‘मूकनायक’ पाक्षिकाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. ‘मूकनायक’ या शीर्षकाखाली संत तुकारामाच्या अभंगांचे ब्रीद लिहिलेले होते.

*काय करू आता धरुनिया भीड, निःशंक हे तोंड वाजविले ।।*
*नव्हे जगी कोणी मुकियाचा जाण, सार्थक लाजून नव्हे हित ।।*

संत तुकाराम हे विद्रोहाची परंपरा जपणारे महाराष्ट्रातल्या भूमीतलेच आहेत. त्यांची अभंगवाणी २०व्या शतकामध्ये किती प्रेरणादायी आहे. याची जाणीव आजही आपणास येते.

## अर्थपूर्ण

मूकनायकाच्या उजव्या बाजूस वार्षिक दर २।। रु. तर डाव्या बाजूस जाहिरातीचे दर; ओळीस पहिल्या वेळी ५ आणि दुसऱ्या वेळी ४ आणे, कायमचे २।। आणे अशा प्रकारचे दर छापलेले होते. ‘मूकनायक’ पाक्षिकाचे एकूण १९ अंक प्रकाशित झाले आहेत.

प्रत्येक अंकाचे वेगळेपण आहे. लोकांचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करणारे ‘मूकनायक’ अर्थपूर्ण नाव होते. ‘मूकनायक’ अल्पकाळ जगले असले तरी या पाक्षिकाने तत्कालीन अस्पृश्य समाजाला संघर्ष करण्याची शक्ती दिली. ते एखाद्या ताऱ्याप्रमाणे प्रकाशयात्री ठरले. समाजप्रबोधनाचा वसा घेऊन जनसामान्यांचा आवाज बुलंद करता आला. गाऱ्हाणी मांडता आली. मूकनायक पाक्षिकाचा जन्म जातिअंताच्या पर्वाची ठिणगी होती असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

## अग्रलेखांतून प्रबोधन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सिडनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यामुळे मूकनायक’ पाक्षिकाचे संपादक झाले नाही. परंतु, संपादकपदाची जबाबदारी पांडुरंग नंदराम भटकर यांच्याकडे होती. नंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण पूर्ण करण्यासाठी परदेशात गेले, तेव्हा ज्ञानदेव घोलपांनी मूकनायकाची जबाबदारी स्वीकारली. परंतु, मूकनायकाच्या संदर्भात काही आर्थिक गडबडीच्या कारणावरून डॉ. बाबासाहेबांनी त्यांना पदमुक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रीय कारकिर्द १९२० पासून सुरू झाली. मूकनायकात एकूण १५ लेख, अग्रलेख प्रकाशित झाले आहेत. त्यापैकी ११ अग्रलेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिले आहेत. लेख आणि अग्रलेख वर्तमान (वास्तव) आणि भविष्यातील वेध घेणारे आहेत. हे १९व्या शतकातील अग्रलेख विसाव्या शतकातसुद्धा तंतोतंत लागू पडतात. आजच्या राजकीय परिस्थितीचा लेखाजोखा त्यांच्या अग्रलेखाची आठवण करून देतो. सामाजिक, धार्मिक लेखाची मार्मिकता अधोरेखित करता येते. अस्पृश्य आणि बहिष्कृत

वर्गाला मूकनायक पाक्षिकाने वैचारिक खाद्य पुरवले. मूकनायकाच्या अलौकिक व भरीव कामगिरीमुळे लोकलढे यशस्वी करता आले. उदा. महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि नाशिकच्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह/पर्वती सत्यागृह इ.

## धर्म व समाजव्यवस्था

बाबासाहेबांनी 'मूकनायक' पाक्षिकाबरोबरच समाजजीवनात पर्दापण केले. तत्कालीन समाजव्यवस्थेने अस्पृश्य वर्गाला अज्ञान अंधश्रद्धेच्या खाईत लोटून दिले. अस्मिता नि अस्तित्व हिरावले, त्यांची आर्थिक व शैक्षणिक कोंडी केली. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली. अशी अवहेलना करणाऱ्या सनातनी धर्माबद्दल बाबासाहेब लिहितात, 'हिंदू समाज हा एक मनोरा आहे व जात म्हणजे त्याचा एक मजला होय. दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे, त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला इसम, मग तो कितीही लायक असो; त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही. वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यात लोटण्याची कोणाची प्राज्ञा नाही. (मूकनायक ३१ जाने १९२०).'

बाबासाहेबांनी हिंदू धर्मशास्त्राची चिकित्सा केली. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातील सापेक्ष विचार सांगताना बाबासाहेब 'ब्रोकन मॅन'ची थिअरी मांडतात. सामाजिक, वैचारिक जाणिवेने ओतप्रोत असलेले अग्रलेख केवळ सम्यक क्रान्तीची दिशा देत होते. माणसाला प्रतिष्ठा, सन्मान बहाल करण्याचे धाडस मूकनायकातून केले आहे. समाजाला बोलके करणारी आणि अन्याय, अत्याचाराला वाचा फोडणारी बाबासाहेबांची भाषा होती. त्यात शिक्षणाचा विचार अंर्तभूत होता. ह्या संदर्भात बाबासाहेब म्हणतात, 'प्राथमिक शिक्षण मुलांना आणि मुलींना मोफत व सक्तीचे शक्य तितक्या लवकर सुरू व्हावे'' (मूकनायक : ५ जून १९२०)

## विषमतावादी धोरणावर प्रहार

मूकनायक पाक्षिकातील विचार अत्यंत मार्मिक, भेदक आहे. या लेख, अग्रलेखातून समाजातील ज्वलंत प्रश्नावर त्यांनी आपले मत प्रकट केले. ते प्रश्न जगण्याचे होते. सामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे प्रश्न आजही भेडसावतात. उदा. स्वराज्याची सर सुराज्याला नाही (मूकनायक : १४/२/१९२०), हे स्वराज्य नव्हे, हे तर आमच्यावर राज्य (मूकनायक : २८/२/१९२०).



स्वराज्यातील आमचे आहोरण त्याचप्रमाणे त्याची पद्धत (मूकनायक : २७/३/१९२७), अ. भा. बहिष्कृत समाज परिषद (मूकनायक : ५/६/१९२०) काकगर्जना! (मूकनायक : ३१.७/१९२०), सिंहगर्जना! (मूकनायक : १४/८/१९२०), दास्यावलोकन (मूकनायक : २८/८/१९२०), हिन्दी राष्ट्राची प्राणप्रतिष्ठा (मूकानायक : २३/८/१९२०) इत्यादी दिशादर्शक अग्रलेखांतून बाबासाहेबांनी धर्मजातिव्यवस्थेला हादरे दिले. जातीधर्माच्या विषमतावादी धोरणावर प्रहार केला. द्वेष/मत्सराने बरबटलेली जुलमी मानसिकतेवर प्रहार ओढले.

मूकनायकाच्या पहिल्या अंकात (३१/१/१९२०) बाबासाहेब लिहितात, 'आमच्या या लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचवण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमी नाही. परंतु, मुंबई इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्रांकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातींच्या हिताची पर्वा त्यांना नसते. इतकेच नव्हे तर, केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रलाप निघतात. समाज ही नौकाच आहे. ज्याप्रमाणे आगबोटीतून बसून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणून-बुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक

स्वभावामुळे म्हणा जर का मागाहून जलसमाधी घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार यात बिलकुल शंका नाही, म्हणून स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करावयाचे मुर्खांचे लक्षण शिकू नये.'

## जनसामान्यांची भूमिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका जनसामान्यांची होती. मूकनायकातील रास्त भूमिकेला काही पत्रे उचलून धरत होते. त्यांना न्याय मिळावा अशी आशा करीत होते. तर काही वृत्तपत्रे, नियतकालिके बाबासाहेबांच्या लिखाणात विरोध करीत होते. उदा. भा. ब. भोपटकर यांनी 'भाला'मधून प्रचंड टीका केली. पण, त्यांच्या टीकेला डॉ. आंबेडकरांनी आपल्या खास शैलीत उत्तरे दिली आहेत. तसेच 'केसरी'मधूनही टीका करण्यात येई. 'आम्हास पक्के आठवते की, जेव्हा १९२० साली आम्ही मूकनायक पत्र सुरू केले तेव्हा केसरीला आमची जाहिरात फुकट छापा अशी विनंती केली होती. पण, ती धुडकावून लावण्यात आली! तद्‌नंतर तुमचा आकार देतो छापा असे लिहल्यावर जागा रिकामी नाही, असे उत्तर देण्यात आले! इतकेच नव्हे तर अभिप्रायही दिला नाही व परत भेटही दिली नाही. (बहिष्कृत भारत, २० मे १९२७)

## विविधरंगी भाषेचा उपयोग

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रीय भाषा आणि ग्रंथलेखनाची भाषा वेगळी आहे.

त्यांची वृत्तपत्रीय भाषा उपरोधिक, निश्चयी आणि ध्येयवादी होतीच शिवाय सुचक प्रहार करणारी अलंकारिक होती. ते वाक्‌प्रचार, म्हणी, दृष्टान्त, सुविचार यांचा सढळ उपयोग करत. यावरून त्यांचे मराठी भाषाज्ञान समृद्ध होते, यात शंका नाही आणि इंग्रजी भाषेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रभुत्व होते. त्यामुळे त्यांनी इंग्रजी संवाद, भाषणे आणि ग्रंथलेखन इंग्रजीमधून केले आहे.

बाबासाहेबांची भाषा सहज सोपी आणि साधी होती, जनसामान्यांची होती. दंभस्फोट करणारी असली तरी ही भाषा दिशादर्शक होती. त्यामुळेच जनसामान्यांचे परिवर्तन करता आले. पौराणिक दाखले, कथांचा वापर करताना खरे-खोटे तपासून पाहिल्याशिवाय ते लिहित नसत. अशा या मराठी आणि इंग्रजी भाषेच्या वैभवशाली संपन्नतेची साक्ष बाबासाहेबांनी आपल्या लिखाणात अधोरेखित केली आहे.



मूकनायक पाक्षिकामध्ये पत्रव्यवहार, करुण कहाणी, वेडी कोकरे, बहिष्कृतांच्या नावावर चरणारे गुंड, विविध विचार वार्ता, कुशल प्रयत्न, शेला पागोटे इत्यादी प्रकारच्या विविध वृत्तांचा व सदरांचा खजिना प्रकाशित होत असे. हे लिखाण आणि सदरे वास्तव, वर्तमानातील घडामोडींवर भाष्य करणारे होते.

## राजर्षिंचे अर्थसाहाय्य

३१ जाने. १९२० चा 'मूकनायक पाक्षिक काढण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी २५००/- रू. अर्थसाहाय्य केले होते. त्यानंतर काही दिवसांनी मूकनायक आर्थिक अडचणीत सापडले तेव्हा छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानचे दिवाण आर. व्ही. सबनीस यांना या वृत्तपत्रास आर्थिक मदत करण्याविषयी २४ जाने. १९२१ रोजी पत्र लिहले. 'मूकनायक'चे संपादक श्री. घोलप यांना ७००/- रू. चा एक चेक पाठवण्याची व्यवस्था करावी. ही रक्कम देणगी म्हणून मानली जावी, असे त्यात नमूद करण्यात आले होते. १२०-१२१ त्यानंतर (२१.२.१९२१ रोजी 'मूकनायक'चे संपादक डी. डी. घोलप यांना पुन्हा छत्रपतींकडून चेकने रू. १००० मिळाले) तरीसुद्धा 'मूकनायक' पाक्षिकाची आर्थिक कोंडी फुटेना, खडतर मार्ग सुकर होत नाही असे चिन्ह दिसत असताना बाबासाहेब आंबेडकरांचे जिवलग मित्र नवल भथेना यांनी मूकनायकाला सहकार्य केले. त्या वेळी बाबासाहेब आणि नवल भथेना यांच्यात पत्रव्यवहार झाला. त्या पत्रव्यवहारात उद्योगपती गोदरेज यांचा उल्लेख सापडतो.

मूकनायक आपल्या सुरुवातीच्या अंकात गोदरेज कंपनीच्या सेफची (तिजोरी/कपाट) जाहिरात छापत असे. या नामांकीत कंपनीची जाहिरात मूकनायकसारख्या दलित पाक्षिकाला मिळण्यामध्ये नवल भथेनांचा मोठा वाटा होता.'' (परिवर्तनाचा वाटसरू डॉ. आंबेडकराचे सहकारी नवल भथेना : प्रबोधन पोळ पा. न. ३४ अंक १६ ते ३० एप्रिल १९१८) नवल भथेनांनी मूकनायकाच्या आठ अंकाना जाहिरात मिळवून दिली.

'मूकनायक' पाक्षिकामुळे अस्पृश्य आणि बहिष्कृतांच्या आयुष्यात नवी झळाळी आली. 'मूकनायक' पाक्षिकाचे शताब्दी वर्ष आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता स्वयंसिद्ध, सजग अनुभवातून, सहजाणिवेतून आविष्कारलेली होती तसेच ती सम्यक अभिसरणाच्या दिशेने जाणारी होती.

# महापरिनिर्वाण दिन असा पाळा...

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६३ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ५ आणि ६ डिसेंबर, २०१९ रोजी येणाऱ्या अनुयायींनी खालील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीने केले आहे.

- महापरिनिर्वाण दिन हा दुःखद दिन असल्याने हा दिवस सर्वांनी गांभीर्यपूर्वक पाळावा.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांचे चिंतन तसेच आत्मपरीक्षण करावे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना शुभ्र वस्त्र परिधान करून सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करावा व त्याकरिता २२ प्रतिज्ञांचे स्मरण करावे.
- चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनासाठी येताना महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या आगमन-निर्गमन मार्गाचा वापर करावा. रांगेतून शिस्तीने व शांततेने अभिवादन करावे. दंडावरील, मानेवरील, हातातील काळे धागे-दोरे काढावे.
- सर्वांना सहकार्य करून बाहेरगावाहून अथवा दूरवरून आलेल्या अनुयायांना अभिवादनाच्या रांगेमध्ये प्राधान्य द्यावे.
- स्वयंसेवक, कार्यकर्ते तसेच महापालिका आणि पोलीस दल यांच्या सूचनांचे पालन करावे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनासाठी आलेल्या अनुयायांच्या गर्दीत बालक, वृद्ध, महिला हरवण्याची दाट शक्यता आहे, हे लक्षात घेता संपर्काकरिता बालक, वृद्ध, महिला यांच्याजवळ पूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक द्यावा.
- अनुयायांनी भगवान बुद्धाच्या शांतेचा मार्ग अवलंबून सामुदायिक वंदना म्हणण्याची प्रथा सुरू करावी. कोणत्याही प्रकारची धक्काबुक्की करू नये, कारण छोट्याशा धक्काबुक्कीचे रूपांतर चेंगराचेंगरीत होऊ शकते.
- आलेल्या महिला अनुयायांनी केसांमध्ये गजरे माळू नयेत.
- शिवाजी पार्क (मैदानात) परिसरात मनोरंजनाची साधने खरेदी करू नयेत.
- बुद्ध-आंबेडकर यांच्याशी संबंधित साहित्य, पुस्तके, सीडी, धम्मध्वज, बिल्ले तसेच विज्ञानवादी विचारावर आधारित धम्म दिनदर्शिका विकत घ्याव्यात.
- पिपाण्या / कोणत्याही प्रकारचे वाद्यवृंद वाजवू नये. घोषणा देऊ नयेत. तसेच शिवाजी पार्क (मैदानात) परिसरात अनधिकृतपणे विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांकडून जुने कपडे विकत घेऊ नयेत.



- बेवारस वस्तूला हात लावू नये व या बाबतीत त्वरित पोलिसांना कळवावे.
- अंधश्रद्धा तसेच अफवा पसरवणाऱ्यांपासून सावध राहावे.
- धूम्रपान करू नये, रहदारीच्या मार्गामध्ये घोळक्याने उभे राहून नागरिकांना अडथळा करू नये.
- स्टॉलमध्ये कुठल्याही प्रकारचे खाद्यपदार्थ शिजवू नये. ज्वलनशील वस्तू / पदार्थ यांचा पूर्णपणे वापर टाळावा. अग्निशमन यंत्रणेकरिता १०१ क्रमांकावर संपर्क साधवा.
- रात्रीच्या वेळी चूल, शेकोटी पेटवू नये, आजूबाजूच्या परिसरात ठिणग्या पसरणार नाहीत, यांची काळजी घ्यावी.
- घातपाती कृत्ये / दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायाने दक्षता बाळगावी. संशयित व्यक्ती, वस्तू आढळल्यास त्यांच्यावर पाळत ठेऊन तत्काळ १०० क्रमांकावर पोलिसांना संपर्क साधावा.
- कोणत्याही प्रकारच्या मदतीकरिता पोलीस नियंत्रण कक्ष, महापालिका कक्ष, तसेच महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे स्वयंसेवक यांच्याशी संपर्क साधावा.
- चैत्यभूमी आणि शिवाजी पार्क व अनुयायांच्या वावराकरिता आरक्षित असलेला सर्व परिसर स्वच्छ ठेवावा, कचरा इकडे-तिकडे फेकू नये.

नागसेन कांबळे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर
महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस आहेत.

**गुरू नानकांचा उल्लेख करताना शीख बांधव तो अतिशय आदराने श्री गुरू नानक देवजी असा करतात. गुरू नानकजी यांना समजून घेण्याचा प्रयास विद्वान व इतिहासकार सतत करत आले आहेत. गुरू नानक यांचा मार्ग हा थेट परमेश्वर भेटीचा मार्ग आहे. गुरू नानक यांच्या ५५० व्या जयंतीनिमित्त हा विशेष लेख..**

# सतनाम

**परमजोत सिंघ चाहेल**

परमेश्वराचं अस्तित्व आपल्यासाठी अतिशय अत्यावश्यक आहे. आता देव अनेक असतील तर त्यांना प्राप्त करण्याचे मार्ग अनेक असणार हे उघड आहे. परमेश्वर एक असेल तरी त्याला प्राप्त करण्याचे मार्ग वेगवेगळे असू शकतात. त्याला समजून घेण्याचे मार्गही अनेक आहेत. महापुरुषांनी हे भिन्न भिन्न मार्ग आपल्याला दाखवले आहेत. 'साधनेच्या मार्गाने आत्म्याची प्राप्ती करा तर उपासनेच्या मार्गाने परमेश्वराला प्राप्त करा, आत्म्याला नाही' असे त्यांनी सांगितले आहे. आत्मा व परमात्म्याचा संबंध शोधून काढण्याचे अनेक मार्ग या जगात प्रचलित आहेत. गुरू नानकजींनी माणसामध्येच परमेश्वर शोधला. या सृष्टीतच परमेश्वर आहे असे सांगितलं.



## 'सत्य' व 'सत'

'सतनाम' चा संदेश दिला. सतनाम हे परमेश्वराचं नाव आहे. हा संसार 'सत्य'ही आहे व 'सत'ही आहे. शब्दकोशात 'सत्य' व 'सत' यांचा अर्थ एकच आहे. दोघांत काही फरक नाही. पण 'सत्य' व 'सत' यांचं विश्लेषण केलं तर त्यातला बारीक भेद लक्षात येतो. पाणी व जल हे दोन्ही एकाच अर्थाचे शब्द. त्यांच्यात भेद नाही. पण वैज्ञानिक जेव्हा त्याचं विश्लेषण करतात तेव्हा त्यातला फरक लक्षात येतो. शास्त्रज्ञ खोलात जातात. अनेक प्रयोग करतात आणि त्या नंतर असं म्हणतात की पाणी एक नाही तर ते २ घटक आहेत. कारण पाणी हे हायड्रोजन व ऑक्सिजन नामक २ वायूंचं मिश्रण आहे. हे दोन वायू एकत्र केले की पाणी बनतं. याच प्रकारे 'सत्य' व 'सत' यांचं विश्लेषण केलं जाऊ शकतं. सत्य व सत एकच आहे. त्यांचा मूळ गाभा एक आहे. पण खोलात गेलात तर त्यातला फरक लक्षात येईल.

'सत' म्हणजे ते की जे अस्तित्वात आहे, ज्याची आपण अनुभूती करू शकतो. तर दुसरीकडे सत्याला स्पर्श नाही केला जाऊ शकत. त्याची अनुभूती नाही घेतली जाऊ शकत. हे उदाहरणच बघा. त्यातून हे अधिक स्पष्ट होईल.

आरशासमोर उभे राहा. तुमचं प्रतिबिंब आरशात दिसेल. पण ते प्रतिबिंब म्हणजे तुम्ही नाही. ते प्रतिबिंब व तुम्ही वेगवेगळे आहात. ते प्रतिबिंब सत्य आहे. पण त्याची अनुभूती नाही घेतली जाऊ शकत. पण तुम्ही सत्य आहात तुमची अनुभूती घेतली जाऊ शकते.

गणितातले आकडे सत्य असतात. पण त्यांची अनुभूती नसते. त्यांना आपण स्पर्श नाही करू शकत. पण तुम्ही 'सत' आहात. तुमचा अनुभव घेतला जाऊ शकतो. ते आकडे आणि आपण वेगवेगळे आहोत.

झोपेत आपण स्वप्न बघतो. ते सत्य असतं पण आपण त्याचा अनुभव नाही घेऊ शकत. तुम्ही जागे झालात की ते स्वप्न संपतं. म्हणजेच स्वप्न सत्य असलं तरी त्याची अनुभूती नाही घेता येत. तुम्ही 'सत' आहात. तुमचा अनुभव घेतला जाऊ शकतो. एखादा चित्रकार चित्र काढतो. ते चित्र वेगळं व तो चित्रकार वेगळा! चित्र काढून तो चित्रकार वेगळा झाला तरी ते चित्र राहातं. ते पुसलं जात नाही. चित्राचा अनुभव घेता येतो तसंच चित्रकाराचाही अनुभव घेता येतो.

मूर्तिकार मूर्ती बनवतो. ती मूर्ती वेगळी आणि मूर्तिकार वेगळा. पण मूर्ती बनवून तो मूर्तिकार त्या मूर्तीपासून वेगळा झाला तरी ती मूर्ती नष्ट होत नाही. मूर्तीचा अनुभव घेता येतो आणि मूर्तीकाराचाही!

पण नर्तकाच्या बाबतीत असं होत नाही. नृत्य थांबलं की त्या क्षणी ते नृत्य संपलेलं असतं, भूतकाळ बनलेलं असतं. नृत्य जोपर्यंत चालू असतं तो पर्यंत ते नृत्य व नर्तक हे दोन्ही दिसत असतात. पण नृत्य थांबलं की नर्तक दिसतो, मात्र ते नृत्य दिसत नाही. खरं तर नृत्य व नर्तक हे दोन्ही एकच आहेत! चित्रकार व चित्र वेगवेगळे आहेत. मूर्तिकार व मूर्ती वेगवेगळे आहेत आणि गणिताचे आकडे

व माणूस हेही वेगळे आहेत. परमेश्वर नर्तक व सृष्टी नृत्य आहे. दोन्हीही एकच आहेत. रचना व रचनाकार हे दोन्ही एकच आहेत. निर्माण व निर्माता हे दोन्हीही एकच आहेत. गुरू नानकजी म्हणतात, जर हे दोन्हीही एकच आहेत तर मग त्याच्या शोधासाठी संसाराचा त्याग करण्याची गरज नाही. राज्यत्याग करण्याची गरज नाही. पत्नी, मुलं यांचा त्याग करण्याची आवश्यकता नाही. ब्रह्मचर्य व्रताचं पालन करण्याची गरज नाही. नियम, उपवास, रोजे यांची आवश्यकता नाही. नदीत एका पायावर उभं राहून तपस्या करण्याचीसुद्धा गरज नाही. जंगलात जाऊन राहण्याची गरज नाही. अन्नत्याग करून शरीराला यातना देण्याची आवश्यकता नाही.

## परमात्मा आणि मानव

गुरुजींनी परमात्मा आणि माणसामध्ये संबंध प्रस्थापित करण्यावर भर दिला. त्यांनी देव व माणसामधील संबंध एकदम सोपे व सहज करून दिले. परमात्मा व माणूस एकच आहेत; आणि ते एकच असल्याने संसारात राहूनही माणूस 'त्याच्या'शी नातं जोडू शकतो हे त्यांनी सांगितलं. ज्याचं अस्तित्व आहे तो 'सत' आहे. ही सृष्टी 'सत' आहे. 'सत'चा अनुभव घेतला जाऊ शकतो. या उलट सत्य दिसतं पण त्याचा अनुभव सहज नाही घेतला जाऊ शकत !

गुरु नानकजींनी विश्वभ्रमण केलं आणि नदीच्या पाण्यात ३ रात्री बसून 'त्या'ला प्राप्त करून घेतलं. जेव्हा ते त्या पाण्यातून बाहेर आले तेव्हा या जगाला ते 'त्या' च्या नजरेतून बघायला लागले. तेव्हा परमेश्वराच्या आज्ञेने गुरुजींनी मंत्राचं उच्चारण केलं तेव्हा त्याचा प्रारंभ गणितातील १ ने केला आणि जो पहिला शब्द उच्चारला तो होता 'सतनाम' !

एकीकडे लोक साधनेच्या मार्गावरून चालत आहेत. अगदी जंगलात जाऊन साधना करत आहेत. कुटुंबाचा त्याग करत आहेत. राज्य त्याग करत आहेत. संसारापासून, प्रपंचापासून दूर जाऊन साधनेच्या द्वारा आत्म्याचा शोध घेत आहेत. शरीराला यातना देत आहेत, अन्नत्याग करून, उपाशी राहून साधनेत लीन होत आहेत. संसार हा एक मोह आहे, माया आहे या धारणेने त्यापासून मुक्तीचा मार्ग शोधात आहेत. दुसरीकडे काही लोक नदीच्या पाण्यात एका पायावर उभं राहून तपस्या करताहेत. शरीरावर भस्म चर्चून माळा जपताहेत. वस्त्रत्याग करून परमेश्वराचा शोध घेताहेत. पूजाअर्चना करताहेत. साधना व उपासना हे आत्मा आणि परमेश्वर प्राप्तीचे मार्ग बनले आहेत.

## समाधान व शांती

गोरखनाथजी यांचा भंडारा असो वा गुरू नानकजी यांचा लंगर ...दोघेही अहंकारापासून मुक्तीचा मार्ग सांगतात. लंगरमध्ये तुम्हाला हात वर करून मागायचं आहे कारण तो प्रसाद आहे. घरात पक्वान्न शिजवलं तर ते जेवण झालं! पण तेच पक्वान्न पूजेत ठेवलं, तर तो प्रसाद झाला. पक्वान्न तर तेच आहे!

भंडारा असो वा लंगर, आपल्याला आपला अहंकार मिटवायचा आहे. समाधान व शांती असायला हवी. जेव्हा तुमचा अहंकार मिटेल तेव्हा तुम्ही 'त्या'ला तुमच्या निकट अनुभवाल. गुरुजी म्हणत, सेवा करा, दास बना, सेवक बना, गुरूच्या चरणांवर लोळण घ्या. त्याची आज्ञा माना, कोणतीही शंका मनात आणू नका. सर्व काही त्याच्या इच्छेवर, आज्ञेवर निर्भर आहे. तुम्ही काहीच नाही आहात. तुम्ही संपून जा. तुमच्या व परमेश्वरामध्ये आड येणारा तुमचा अहंकार मिटवा. गुरूच्या मदतीने हा अहंकार कमी केला जाऊ शकतो. या अहंकारामुळेच तुम्हाला असं वाटतं की, तुम्हीच सर्व काही आहात, परमेश्वर काहीच नाही. पण अहंकार जेव्हा संपेल तेव्हा तुमच्या लक्षात येईल की परमेश्वरच सर्व काही आहे, तुम्ही काहीच नाही!

'सतनाम' हे परमेश्वराचं नाव आहे. गुरुजींनी परमेश्वराचं नावही सांगितलं व त्याच्यापाशी पोहोचण्याचा मार्गही!

(निवृत्त न्यायाधीश; सदस्य –गुरुद्वारा बोर्ड, नांदेड)
अनुवाद : जयश्री देसाई

## सेवा

महात्मा बुद्धाप्रमाणे साधना करता करता हा संसार आपोआपच मागे पडतो. बुद्धांना जाणवलं की मानवी मनातील अहंकार हाच या मार्गातील मोठा दगड आहे. त्याला नष्ट करूनच परमेश्वरापर्यंत पोहोचणं शक्य आहे. त्यामुळे बुद्धांनी सांगितलं की हातात कटोरा घेऊन भिक्षा मागा. भिक्षा मागितलीत तर अहंकार समाप्त होईल. तुमचा 'मी' संपणं गरजेचं आहे. तो 'मी'च तर मार्गात आडवा येतोय. ज्या दिवशी तो 'मी' मिटेल त्या दिवशी तुम्ही परमेश्वराला प्राप्त केलेलं असेल. हे उदाहरण बघा. नाण्याच्या एका बाजूला तुमचे छायाचित्र आहे आणि दुसऱ्या बाजूला देवाचे छायाचित्र आहे. नाणं एकच आहे. पण ते नाणं हाच तुमच्या व परमेश्वराच्या मार्गातला अडसर आहे. कारण ते नाणं म्हणजे संपत्ती आहे, शक्ती आहे, अहंकार आहे. ते नष्ट झालं की तुम्ही व तो एक व्हाल. अहंकार संपवल्याशिवाय तुम्ही व तो एक होणं शक्य नाही.

अहंकार नष्ट करण्याचं आवाहन गुरुजी वारंवार करतात. बुद्धाचा मार्ग व गुरुजींचा मार्ग एकच आहे. दोघेही अहंकार नष्ट करण्याचा संदेश देतात. गुरुजी सहजसोप्या मार्गाने अहंकार नष्ट करण्यासाठी मार्गदर्शन करतात. कटोरा घेऊन भिक्षा मागण्याऐवजी तुम्ही स्वतःच अन्नदान करा. लोकांना भोजन द्या. लंगर लावा. भंडारा लावा. प्राणिमात्रांची सेवा करा. गुरूची सेवा करा. याच जगात राहून हे सगळं करा. समाजात राहा. चांगल्या संगतीत राहा. लंगरमध्ये सेवा करताना जातिजातींमध्ये भेद निर्माण करणारा अहंकार मिटवा. उच्च -नीच हा भेद मिटवा. भाषांमधील भेद मिटवा. कोणीही अस्पृश्य नाही. कोणी छोटा नाही. कोणी श्रीमंत नाही, कोणी गरीब नाही. सगळे सारखे आहेत. कोणी सम्राट नाही, कोणी राजा नाही, कोणी श्रीमंत नाही. हा सगळा अहंकार जसजसा सुटत जाईल तसतसा अधिकाधिक परमेश्वरप्राप्तीचा मार्ग सुकर होईल.




लंडन येथे 'वर्ल्ड ट्रॅव्हल मार्केट' प्रदर्शनात महाराष्ट्र राज्याने सहभाग घेतला.

# 'लंडन'मध्ये महाराष्ट्र

**इंग्लंड (युनायटेड किंगडम) ची राजधानी असलेल्या लंडन येथे ४ ते ६ नोव्हेंबर २०१९ दरम्यान झालेल्या 'वर्ल्ड ट्रॅव्हल मार्केट' प्रदर्शनामध्ये सहभागी होत महाराष्ट्राच्या पर्यटन विभागाने राज्यातील विविध पर्यटन संधींची माहिती जगभरातील पर्यटन व्यावसायिकांना उपलब्ध करून दिली. प्रदर्शनात जगभरातील बहुतांश सर्व देशांनी सहभाग घेतला होता. आपापल्या देशातील पर्यटनस्थळांची माहिती देऊन जगभरातील पर्यटक, अभ्यासक, व्यावसायिक आदींना आपल्या देशांकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न यातून करण्यात आला.**

**इर्शाद बागवान**

महाराष्ट्राने वर्ल्ड ट्रॅव्हल मार्केट प्रदर्शनात सहभागी होत राज्यातील पर्यटन वैभवाचे द्वार जगभरातील पर्यटक आणि पर्यटन व्यावसायिकांसमोर खुले केले. राज्याच्या पर्यटन सचिव विनिता वेद-सिंगल, पर्यटन उपसंचालक रामदास खेडकर आदी या प्रदर्शनात सहभागी झाले होते.

## बी टू बी बैठका

प्रदर्शनामध्ये जगभरातील पन्नासहून अधिक पर्यटन संस्था, व्यावसायिक कंपन्या, मीडिया आदींसमवेत बी टू बी बैठकांच्या माध्यमातून संवाद साधण्यात आला. जगाच्या विविध भागातील ट्रॅव्हल कंपन्या, टूर ऑपरेटर, पर्यटन - पुरातत्व - हेरीटेज क्षेत्रातील तज्ज्ञ, ट्रेकर, वाईल्ड लाईफ प्रेमी, जंगल सफारी तसेच क्रुझ पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिक, हौशी पर्यटक, पत्रकार अशा विविध घटकांसोबत राज्याच्या पर्यटन सचिव श्रीमती वेद-सिंगल यांनी संवाद साधला. आइसलँड ट्रॅव्हलरच्या व्होन पीच, स्नॅप प्रॉडक्शनच्या साशा आरु, आय ॲम्बेसिडर ट्रॅव्हल नेटवर्कचे सीईओ केथ जेनकिन्स, सीएमओ निकोलस मोन्टमागी, वर्ल्ड शो मीडियाचे अलेक्झांडर कोलीस, आदी संस्थांच्या प्रतिनिधींसमवेत बी टू बी बैठका घेण्यात आल्या.

## मेडिकल व सोशल टूरिझमलाही चालना

विविध देशातील प्रतिनिधींसमवेत महाराष्ट्रातील मेडिकल टुरिझम, सोशल टुरिझम, एक्सपिरिएन्शिअल टुरिझम आदींबाबत चर्चा झाली. ऐतिहासिक मंदिरे, दर्गा, मशिदी, चर्च, बौद्धकालीन गुंफा आदींची माहिती पर्यटकांना देऊन आध्यात्मिक पर्यटनाला जागतिक व्यासपीठावर स्थान देण्याच्या दृष्टीनेही व्यापक प्रयत्न करण्यात आले. राज्यातील रामायण सर्किट तसेच बौद्ध सर्किटचे परदेशी पर्यटकांसमोर सादरीकरण करण्यात आले.

## उत्तम प्रतिसाद

प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी केंद्रीय पर्यटन सचिव योगेंद्र त्रिपाठी यांच्या हस्ते प्रदर्शनस्थळी

'महाराष्ट्र पर्यटन'च्या स्टॉलचे उद्‌घाटन करण्यात आले. त्यानंतर पुढील तीन दिवसात जगभरातील हजारो हौशी पर्यटक, पर्यटन व्यावसायिक, कंपन्या आदींनी महाराष्ट्र पर्यटनच्या स्टॉलला भेट दिली. ओरिसाचे पर्यटन मंत्री जोतीप्रकाश प्रजापती, सचिव विशालकुमार देव, पर्यटन संचालक सचिन जाधव, दिल्लीच्या पर्यटन सचिव रश्मी वर्मा यांच्यासह देशातील विविध राज्यांच्या अधिकाऱ्यांनीही स्टॉलला भेट दिली.

### लाडू, चकलीची परदेशी पर्यटकांना भुरळ

महाराष्ट्र पर्यटन स्टॉलमधून महाराष्ट्रातील विविध पर्यटनस्थळांची माहिती देणाऱ्या व्हीडीओंच्या पेन ड्राईव्हचे हौशी पर्यटक, ट्रॅव्हलर कंपन्या, देश - विदेशातील उच्चस्तरीय आदींना वाटप करण्यात आले. स्मृतीचिन्हे (मोमेन्टो), महाराष्ट्राचा पर्यटन नकाशा, माहितीपत्रके आदींचेही वाटप करून पर्यटन वैभवाची माहिती पर्यटन व्यावसायिकांपर्यंत पोहोचवण्यात आली. स्टॉलवर चकली, लाडू यांसारखे काही खाद्यपदार्थ ठेवले होते. परदेशी पर्यटकांनी त्याचा आस्वाद घेतला. महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीची माहिती पर्यटकांना देण्यात आली. स्टॉलसमोर मराठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

### अंगकोरवाटपेक्षा अजिंठा, वेरूळ सरस

प्रदर्शनात सहभागी जगभरातील पत्रकार तसेच लंडन येथील पत्रकारांसाठी पत्रकार परिषद आयोजित करून त्यामाध्यमातून राज्यातील पर्यटन संधींची माहिती दिली. त्यात महाराष्ट्रातील उत्सव, व्याघ्र पर्यटन, पोषाख आणि खाद्यसंस्कृती, गडकिल्ले, गुंफा, समुद्र किनारे, जंगले आदी विविध पर्यटन वैभवाची माहिती व्हिडिओद्वारे सादर केली. कंबोडियातील अंगकोरवाट मंदिराचे स्थापत्य हे जगभरातील पर्यटकांचे आकर्षणस्थळ आहे. पण यापेक्षा महाराष्ट्रातील मंदिरांचे स्थापत्य, अजिंठा-वेरुळ येथील कलाकृती अधिक सरस आहेत, अशी प्रतिक्रिया लंडन येथील काही पत्रकारांनी दिली.

### इतर देशांच्या स्टॉलचा अभ्यास

प्रदर्शनात सहभागी इतर देशांच्या स्टॉलला महाराष्ट्राच्या टीमने भेट देऊन त्यांच्या प्रयोगांची माहिती घेतली. यात प्रामुख्याने मालदीव, श्रीलंका, थायलंड, जपान, सिंगापूर, तैवान, इजिप्त, रशिया, माल्टा, स्वित्झर्लंड, फ्रान्स, ग्रीस, फिनलँड, नॉर्वे, युएसए, ब्राझील, मेक्सिको, कोस्टा रिका, पाकिस्तान, बांगलादेश, फिलिपाईन्स, कंबोडिया, कझाकिस्तान, कॅनडा, द. आफ्रिका, केनिया आदी देशांच्या प्रदर्शनींना भेट देऊन त्यांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यात आला.

विभागीय संपर्क अधिकारी (पर्यटन),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

### महाराष्ट्राची कामगिरी

- जगभरातील पन्नासहून अधिक पर्यटन संस्था, कंपन्यांसमवेत बी टू बी बैठका संपन्न
- विविध ट्रॅव्हलर कंपन्या, ॲडव्हेंचर ग्रुप, वन्यजीव पर्यटक संघटना, क्रुझ पर्यटन व्यावसायिक, प्रसिद्धी संस्था, इंडिया लव्हर्स, क्लब ओनर्स, स्टुडंट असोसिएशन आदींबरोबर महाराष्ट्रातील पर्यटन वृद्धीबाबत चर्चा
- स्टॉलला हजारो परदेशी पर्यटक, व्यावसायिकांची भेट
- स्टॉलवर महाराष्ट्रातील खाद्यपदार्थांची मेजवानी
- जगभरातील पत्रकारांसमोर महाराष्ट्रातील पर्यटन वैभवाचे सादरीकरण
- महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांची माहिती देणाऱ्या इंग्रजी भाषेतील व्हिडिओंचा समावेश असलेल्या पेन ड्राईव्हचे हौशी पर्यटक, ट्रॅव्हलर कंपन्या, देश - विदेशातील उच्चस्तरीय आदींना वाटप
- महाराष्ट्राचा पर्यटन नकाशा, माहितीपत्रके आदींचेही वाटप
- प्रदर्शनात महाराष्ट्रातील पर्यटनाला मिळाली मोठी चालना

### जागतिक पातळीवर चालना

प्रदर्शनासंदर्भात प्रतिक्रिया देताना पर्यटन सचिव विनिता वेद-सिंगल म्हणाल्या की, जगभरातील पर्यटकांना भारताचे आणि त्यातही पर्यटन वैविध्य असलेल्या महाराष्ट्राचे कमालीचे आकर्षण आहे. लंडनमधील डब्ल्यूटीएम प्रदर्शनातून हे पर्यटकांमध्ये महाराष्ट्राविषयी रस निर्माण करण्यात आला. जगभरातील नामांकित ट्रॅव्हलर कंपन्या, टूर ऑपरेटर, ॲडव्हेंचर ग्रुप, वन्यजीव पर्यटन संघटना, क्रूझ व्यावसायिक, प्रसिद्धी संस्था, इंडिया लव्हर्स, क्लब ओनर्स, स्टुडंट असोसिएशन आदींबरोबर महाराष्ट्रातील पर्यटन वृद्धीबाबत चर्चा करण्यात आली. यामुळे महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. यापुढील काळात अशा विविध माध्यमातून जागतिक पातळीवर महाराष्ट्राच्या पर्यटनाला सादर करून परदेशी पर्यटकांना महाराष्ट्राकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित केले जाणार आहे.



लंडन येथील पर्यटकांना महाराष्ट्रातील पर्यटनाची माहिती देताना पर्यटन सचिव विनिता वेद सिंगल.

**प्लाँटेशन मॅनेजमेंट इन्फरमेशन सिस्टिमद्वारे ठेवण्यात आलेली ५० कोटी वृक्षलागवडीची नोंद, त्यासाठी माहिती तंत्रज्ञानावर आधारित विकसित करण्यात आलेली प्रणाली, वृक्षलागवडीत मिळवलेला लोकसहभाग, लोकमनात या संकल्पाच्या पूर्तीसाठी निर्माण करण्यात आलेली सांघिक भावना, या सगळ्या बाबी लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या वन विभागाला 'अर्थ केअर पुरस्कार' मिळाला आहे. जेएसडब्ल्यू आणि टाईम्स ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या 'इनोव्हेशन इन क्लायमेट चेंज' या प्रवर्गात वन विभागाला या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

# सन्मान महाराष्ट्राचा

**डॉ. सुरेखा मधुकर मुळे**

समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत वृक्षलागवडीचे महत्त्व पोहोचवण्यासाठी माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतलेले प्रयत्न खूप मोलाचे आहेत. सरपंच, ग्रामसेवक, जिल्हा परिषद अध्यक्ष, महानगरपालिका आयुक्त, विभागीय आयुक्त, महापौर, सर्व जिल्हाधिकारी, शासनाचे सर्व विभाग, यासह सामाजिक, अध्यात्मिक आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, व्यापारी-उद्योजक, कंपन्यांचे, बांधकाम व्यवसायातील प्रतिनिधी, सिनेक्षेत्रातील मान्यवर, या सर्वांना हरित महाराष्ट्र निर्मितीच्या व्यासपीठावर एकत्र आणण्याचे काम त्यांनी केले. यासाठी पत्रव्यवहार केला, प्रत्यक्ष भेटी, बैठका घेतल्या, विविध माध्यमांच्या कार्यक्रमात ते सहभागी झाले. सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होऊन त्यांनी वृक्षलागवडीसाठी आणि संगोपनासाठी एकत्र येण्याची साद घातली. त्याला राज्यातील अबालवृद्धांनी प्रतिसाद दिला.

## 'मन की बात'मध्ये कौतुक

शहरापासून गावखेड्यापर्यंत लोकांनी उत्स्फूर्तपणे वृक्षलागवड केली. यासाठी वन विभागाने अतिशय सुटसुटीत अशी संगणकीय प्रणाली उपलब्ध करून दिली होती. त्यामुळेच लावलेले प्रत्येक रोप त्याच्या वास्तविक वेळेनुसार या डिजिटल प्लॅटफॉर्मवर नोंदवलं गेलं. राज्यात वृक्षलागवडीची नोंद करण्यासाठी तयार केलेल्या या डिजिटल प्लॅटफॉर्मवर १.५ कोटीहून अधिक वृक्षप्रेमींनी ५.८१ लाख वृक्षारोपण स्थळावर लावलेल्या जवळपास ५८ कोटी वृक्षांची नोंद वास्तविक वेळेनुसार घेण्यात आली. या मोहिमेचे उल्लेखनीय यश म्हणजे २७ कोटीहून अधिक वृक्षांची लागवड ही वनेत्तर क्षेत्रात म्हणजे शाळा, महाविद्यालयांचे प्रांगण, पडीक आणि मोकळ्या जागा, रस्ता आणि कालव्याच्या दुतर्फा, रेल्वे, संरक्षण मंत्रालयाच्या जागा, नदीकाठ, शेतात झाली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या संकल्पाची आपल्या 'मन की बात' या कार्यक्रमातून त्याचे कौतुक केले.




'इनोव्हेशन इन क्लायमेट चेंज' या प्रवर्गातील अर्थ केअर पुरस्कार स्वीकारताना वन विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे. सोबत प्रधान मुख्य वन संरक्षक उमेशकुमार अग्रवाल, एम.के राव.

## वृक्षलागवडीच्या संकल्पाचे बीज

जागतिक तापमान वाढ, ऋतुचक्रातील बदल, वारंवार पडणारा दुष्काळ, भूगर्भातील कमी होणारी पाणीपातळी आणि जीवसृष्टीस निर्माण झालेला धोका या आव्हानांना सामोरे जाताना मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केल्याशिवाय पर्याय नाही हे आता जागतिकस्तरावर मान्य झाले आहे. त्या दिशेने पहिले महत्त्वाकांक्षी पाऊल टाकले ते वन विभागाने. १५ ऑगस्ट २०१५ रोजी शालेय विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळा- महाविद्यालयांच्या प्रांगणात किमान २० झाडं लावावीत, असा संकल्प करण्यात आला आणि एकाच दिवशी राज्यात ३० लाख रोपं लागली. त्यानंतर २०१६ च्या

## पुरस्कार

जेएसडब्ल्यू आणि टाईम्स ऑफ इंडियाच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणाऱ्या या पुरस्कारात इनोव्हेशन इन क्लायमेट चेंज या प्रवर्गात वन विभागाला अर्थ केअर पुरस्कार देण्यात आला. ३ लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ५० कोटी वृक्षलागवडीसाठी अवलंबलेल्या डिजिटल फॉरेस्ट गव्हर्नन्ससाठी वन विभागाला हा पुरस्कार मिळाला आहे.

पुरस्कार निवडीसाठी प्रख्यात वैज्ञानिक डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने वृक्षलागवड स्थळांची क्षेत्रीय पाहणी केली. शिवाय वन विभागाने या समितीसमोर सविस्तर सादरीकरण करून झालेल्या मुलाखतीदरम्यान सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. ग्रीन हाऊस गॅसेसचे उत्सर्जन कमी करून नैसर्गिक स्रोतांचे संवर्धन करणे, हवामान बदलांच्या परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी लोकसहभाग मिळवणे, या सर्व निकषांना पात्र ठरल्यानंतर हा पुरस्कार वन विभागाला प्रदान करण्यात आला. डॉ. माशेलकर आणि केंद्रीय पर्यावरण व वनमंत्रालयाचे सचिव सी.के.मिश्रा यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे पुरस्कार कार्यक्रम संपन्न झाला. वन विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, प्रधान मुख्य वन संरक्षक उमेशकुमार अग्रवाल, एम.के राव यांनी हा पुरस्कार स्वीकारला.




एक जुलैला एकाच दिवशी २ कोटी रोपे लावण्याचा संकल्प केला. यात सहा लाख लोक सहभागी झाले आणि राज्यात एका दिवसात २ कोटी ८२ लाख रोपे लागली.

वृक्षलागवडीला मिळालेला लोकसहभाग खूप उत्साहवर्धक होता. या वृक्षोत्सवाला एक परिपूर्ण नियोजन आवश्यक होते. त्यातूनच पुढे तीन वर्षांसाठी ५० कोटी वृक्षलागवडीचा आराखडा आखला गेला. ४ कोटी, १३ कोटी आणि ३३ कोटी असे मिळून ५० कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले.

## वृक्षलागवडीची दखल

२०१७ चा ४ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प ५ कोटी ४३ लाख रोपे लागून पूर्ण झाला. १६ लाख लोक या उपक्रमात सहभागी झाले. २०१८ ला १३ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प १५ कोटी ८८ लाख रोपे लागून पूर्णत्वाला गेला. यात ३६ लाख लोक सहभागी झाले. दोन, चार आणि १३ कोटी वृक्षलागवडीची दखल लिम्का बूक ऑफ रेकॉर्डने घेतली आणि सलग तीनदा हे प्रमाणपत्र मिळवण्याचा मान वन विभागाला प्राप्त झाला. जुलै ते सप्टेंबर २०१९ या कालावधीत ३३ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प ३५ कोटी १३ लाख ७६ हजार ३६१ रोपे लावून पूर्णत्वाला गेला. यात ९५ लाख १९ हजार ६३५ लोक सहभागी झाले. वन विभागाने वृक्षलागवडीतील विश्वासार्हता वाढण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला. लावलेल्या प्रत्येक रोपाची अक्षांश-रेखांशासह संकेतस्थळावर नोंद घेण्यात आली. 'माय प्लॅन्ट' नावाचे मोबाइल ॲप विकसित करून खासगी व्यक्ती, संस्था आणि संघटनांनी लावलेल्या जवळपास ५ लाखांहून अधिक रोपांची माहिती या ॲपद्वारे नोंदवण्यात आली. वन विभागाच्या नागपूर कार्यालयात यासाठी स्वतंत्र कमांड कंट्रोल रुम विकसित करण्यात आली.

## प्रोत्साहनात्मक योजना

वन विभागाने यासाठी अनेक प्रोत्साहनात्मक योजना राबवल्या. वनयुक्त शिवार, रोप आपल्या दारी, कन्या वन समृद्धी योजना, वनशेती, भाऊसाहेब फुंडकर फळझाड लागवड योजना, अटल बांबू समृद्धी अभियान, रानमळा पॅटर्न, अटल घन वन योजना, फलोत्पादन कार्यक्रम अशा अनेक योजनांमधून प्रोत्साहन देण्यात आले. यात वृक्षाच्छादन वाढावे हा जसा उद्देश होता तसाच त्यातून एक आर्थिक चळवळ गतिमान करण्याचाही प्रयत्न झाला. या पूर्ण वृक्षलागवडीमध्ये फळझाडांची मोठ्या प्रमाणात लागवड झाल्याने शेतकऱ्यांना पर्यायी उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले आहे.

## वृक्षाच्छादनात वाढ

राज्यातील नागरिकांनी एकत्र येत वृक्षोत्सव साजरा केला. हरित महाराष्ट्राच्या दिशेने पडलेले हे एक शुभलक्षणी पाऊल आहे. याचे दृश्य फलित हे भारतीय वन सर्वेक्षण अहवालातून दिसून आलं आहे. वनेतरक्षेत्रातील वृक्षाच्छादन २७३ चौ. कि.मी.ने वाढल्याची नोंद यात घेण्यात आली आहे. कांदळवन संवर्धनात राज्य देशात अग्रस्थानी राहिले असून यात ८२ चौ.कि.मी.ची वाढ झाली आहे. वनक्षेत्रातील जलव्याप्त क्षेत्र ४३२ चौ.कि.मी.ने वाढलं आहे तर बांबूचं क्षेत्र ४४६२ चौ.कि.मी.ने वाढलं असल्याचेही या अहवालात स्पष्ट केले आहे. राज्याचे सध्याचं वनक्षेत्र २० टक्के आहे. ते ३३ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी ४०० कोटी वृक्ष लावणे गरजेचे आहे.

## मोलाची मदत

हा पुरस्कार एकट्या वन विभागाचा नाही तर वृक्षलागवडीत सहभागी होऊन योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्ती, संस्था आणि संघटनेचा हा पुरस्कार आहे. या सर्वांतर्फे आम्ही हा पुरस्कार स्वीकारला आहे. वृक्षलागवड केवळ शासकीय उपक्रम न ठेवता त्याचे लोकचळवळीत रूपांतर केल्यामुळे हा पुरस्कार या सर्वांच्या सर्मपणाचे फलित आहे. यासाठी एनआयसी आणि केपीएमजी या संस्थांची मोलाची मदत झाल्याची प्रतिक्रिया वन विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे यांनी यानिमित्ताने दिली.

वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)

**जेव्हा हवेचे तापमान वाढते तेव्हा हवेचा दाब कमी होतो. वारा जास्त हवेच्या दाबाकडून कमी हवेच्या दाबाकडे वाहतो, तेव्हा बाष्प घेऊन येतो आणि जेथे हवेचा दाब कमी असेल तेथे अतिवृष्टीसारखी परिस्थिती निर्माण होते. तर जेथे तापमान सरासरीपेक्षा कमी राहते तेथे हवेचे दाब वाढतात आणि दुष्काळी परिस्थिती ओढावते. यास आपण हवामान बदल असे संबोधतो. काही भागात अवकाळी होणारा पाऊस आणि त्यातून होणारे शेतीचे नुकसान हे नेहमीचेच झाले आहे. काही कालावधीत उदा. फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे महिन्यात होणारी गारपीट आणि पाऊस यामुळे नुकसान होत आहे.**

# हवामानबदलाची दिशा

**प्रा. दीपाली मुटकुळे**

पृथ्वीभोवती असलेल्या हवेचे तापमान १९५५ सालानंतर ०.५ अंश सेल्सियसने वाढल्याचे आय.पी.सी.सी. या आंतरराष्ट्रीय संस्थेचे शास्त्रज्ञ श्री. अलगोर व श्री. पर्चारी यांनी दाखवून दिले. १९९८ साल हे २०व्या शतकातील सर्वात उष्ण वर्ष असल्याचे त्यांनी दाखवून दिले. तसेच १९९८ सालापासून जागतिक तापमान वेगाने वाढत असल्याचे त्यांनी सिद्ध केले.

हवामानबदल वाढती वाहनांची संख्या, वाढती कारखानदारी, वाढत्या वातानुकूलित इमारती या सातत्याने कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन वाढवीत आहेत. जनावरांचे रवंथ करण्यामधून मिथेन वायुचे उत्सर्जन वाढत आहे. भातखाचरात होणारा अतिरिक्त नायट्रोजन खतांचा वापर नायट्रस ऑक्साइडचे प्रमाण वाढवत आहे. त्यामुळेच एका बाजूस वायुप्रदूषणात सातत्याने वाढ होत आहे. तर दुसऱ्या बाजूस कार्बन डायऑक्साइड वापरणारी वने व वनस्पती मोठ्या प्रमाणावर नष्ट होत आहेत.

आशिया खंडातील ६० दशलक्ष हेक्टर जंगल मानवाने आजपर्यंत नष्ट केले आहे. म्हणजेच कार्बन डायऑक्साइड वापरणारी यंत्रणा मानवाने नष्ट केली आहे. त्यामुळे हवेत कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे. सूर्यप्रकाशापासून मिळणारी ऊर्जा व उष्णता कार्बन डायऑक्साइड वायू धरून ठेवतो. त्यामुळे पृथ्वीच्या वातावरणाचे तापमान वाढत आहे. त्यामुळेच त्याला जागतिक तापमान वाढ असे नामकरण केले आहे. जेव्हा हवेचे तापमान वाढते तेव्हा हवेचा दाब कमी होतो. वारा जास्त हवेच्या दाबाकडून कमी हवेच्या दाबाकडे वाहतो, तेव्हा बाष्प घेऊन येतो आणि जेथे हवेचे दाब कमी असतील तेथे अतिवृष्टीसारखी परिस्थिती निर्माण होते. तर जेथे



तापमान सरासरीपेक्षा कमी राहते तेथे हवेचे दाब वाढतात आणि दुष्काळी परिस्थिती ओढावते. यास आपण हवामान बदल असे संबोधिते. काही भागात अवकाळी होणारा पाऊस आणि त्यातून होणारे शेतीचे नुकसान हे नेहमीचेच झाले आहे. काही कालावधीत उदा. फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे महिन्यात होणारी गारपीट आणि पाऊस यामुळेही नुकसान होत आहे.

## पर्यायी शेती व्यवस्थापन

**पीक पद्धतीत बदल :** कापूस पिकाचे क्षेत्र कमी करून तिथे तूर, सोयाबीन, मका, घेवडा, मिरची या पिकांचा पीक पद्धतीत समावेश करावा. महाराष्ट्र राज्यात कापूस पिकाखालील क्षेत्रात सातत्याने वाढ होत आहे. त्यास कारणही तसेच आहे. बी.टी. कपाशीचे बियाणे निर्मित करून शेतकऱ्यांना उत्पादन वाढेल अशी माहिती दिल्याने क्षेत्रात वाढ होत आहे. प्रत्यक्षात कापूस पिकाचा कालावधी ७ ते ७.५ महिन्याचा तर मान्सूनचा कालावधी ४ महिन्यांचा असल्याने पर्जन्यमान आणि कपाशीचा कालावधी जुळत नसल्याने कपाशीच्या क्षेत्रात होणारी वाढही गंभीर समस्या निर्माण करीत आहे. कपाशीचे ९४ टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे. कपाशी वाढीच्या काळात गरजेनुसार पाणीपुरवठा न झाल्याने कपाशीची महाराष्ट्रातील सरासरी उत्पादकता केवळ २.९३ क्विंटल प्रतिहेक्टर आहे. त्यामुळे उत्पादनाचा खर्च अधिक आणि उत्पादकता अतिशय कमी असल्यामुळे खर्चापेक्षा उत्पन्न कमी झाल्याने कपाशी लागवड करणारे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत आहेत तसेच ते कर्जबाजारी होत आहेत. तेव्हा कपाशीखालील ४० लाख हेक्टर क्षेत्रांपैकी २० ते ३ लाख हेक्टर क्षेत्र कमी करून

तेथे तूर, सोयाबीन, मका, घेवडा, मिरची या पिकांची लागवड करून शाश्वत शेती उत्पादन साधण्याची गरज आहे.

**रुंद-वरंबा व सरी पद्धत वापरणे :** मूलस्थानी जलसंधारणाचे उपाय म्हणून रुंद-वरंबा व सरी पद्धतीचा वापर वाढवणे गरजेचे असून सोयाबीन व घेवडा या दोन्ही पिकांची पेरणी रुंद-वरंब्यावर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. त्यामुळे हेक्टरी उत्पादकता वाढू शकेल.

**रब्बी ज्वारीसाठी बंदिस्त वाफे :** पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी मोठ्या आकाराचे वाफे तयार करावेत. जमिनीच्या उतारानुसार वाफ्याचा आकार ठेवावा. वाफे तयार करताना सारा यंत्राने सारे करून त्यामध्ये नांगराने योग्य अंतरावर दंड व पाट टाकल्यास कमी खर्चात बंदिस्त वाफे तयार करता येतात व पावसाचे पाणी वाफ्यात मुरते. योग्य ओलीवर पेरणी केल्यास पुन्हा होणाऱ्या पावसाचे पाणी वाफ्यात मुरते आणि ज्वारीच्या वाढीसाठी उपयुक्त ठरते. त्यामुळे हेक्टरी ३० टक्के उत्पादन वाढते. ही मूलस्थानी जलसंधारणाची पद्धत रब्बी ज्वारीसाठी वापरणे आवश्यक आहे.

**रब्बी हंगामात हरभरा पिकाखाली क्षेत्रात वाढ करणे :** हरभरा हे कमी पावसावर व कमी पाण्यावर येणारे पीक आहे. जेथे २ पाणी उपलब्ध असतील तेथे बागायत हरभऱ्याची लागवड करावी. तर कोरडवाहू हरभऱ्याची लागवड ऑक्टोबर महिन्यात करून सारे पाडावेत. त्या साऱ्यांमध्ये पावसाचे पाणी मुरेल आणि हरभऱ्याची उत्पादकता वाढेल.

**संरक्षित शेतीचा अवलंब करणे :** पॉलिहाऊसमध्ये ढोबळी मिरची, जरबेरा, गुलाब, टोमॅटो इत्यादी पिकांच्या लागवडीवर भर द्यावा. प्रत्येक शेतकऱ्याने कमीतकमी १० गुंठे क्षेत्रावर पॉलिहाऊसची उभारणी करून ठिबकद्वारे पाणीपुरवठा व द्रवरूप खते देऊन शेतीमाल तयार करून उत्पादन व उत्पादकता वाढवावी.

**आंतरपीक पद्धतीचा अवलंब करणे :** एकपीक पद्धतीपेक्षा आंतरपीक पद्धती निश्चितपणे फायद्याची आहे. मुख्य पिकाशिवाय आंतरपिकाचे उत्पादन बोनस मिळते. कोरडवाहू क्षेत्रात बाजरी + तूर (२:१), सोयाबीन + तूर, कपाशी + मूग किंवा उडीद अशी आंतरपिके घेणे फायद्याचे ठरते. तसेच बागायती क्षेत्रात ऊस + बटाटा किंवा भुईमूग, ऊस + हरभरा, ऊस + कांदा, ऊस + फुलकोबी किंवा कोबी, अशा प्रकारे अनेक आंतरपिके जिरायत आणि बागायत क्षेत्रात घेणे शक्य आहे.

**आच्छादनांचा वापर करणे :** कोरडवाहू क्षेत्रात ५ टन आच्छादनांचा वापर करून बाष्पीभवनाचा वेग रोखता येणे शक्य आहे. तसेच उन्हाळी हंगामात फळबागांमध्ये आच्छादन गरजेचे आहे.

**प्रकाश परिवर्तकांचा वापर करणे :** केओलीनची ८ टक्के फवारणी करून प्रकाश परिवर्तन करून बाष्पीभवनाचा वेग कमी करता येतो. फळपिकांसाठी पाणीटंचाईच्या काळात ही पद्धत वापरावी.

**जलयुक्त शिवार अभियान :** महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार अभियानाद्वारे दरवर्षी ५००० गावात साखळी बंधारे व तळी तयार करून पाणी समस्या सोडवण्याचे अभियान सुरू केले आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात जलसंधारण व पाणीसाठा होऊन भूगर्भातील पाणीपातळी वाढून कोरडवाहू भागातील पिण्याच्या पाण्याचे आणि जनावरांच्या चाऱ्याचे प्रश्न मिटतील.

**सूक्ष्म सिंचन पद्धतीचा अवलंब :**

पाण्यात बचत करण्यासाठी ठिबक सिंचन वापरल्यास ५० टक्के पाणी बचत होऊ शकते. त्यामुळे सध्याच्या बागायत क्षेत्रात दुप्पटीने वाढ करणे शक्य आहे. त्यासाठी बंद पाइपने पाणीपुरवठा योजना राबवणे गरजेचे आहे. ठिबक सिंचन पद्धतीने कमी पाण्यात द्रवरूप खते दिल्याने अधिक व चांगल्या प्रतीचे सिंचन पद्धतीने पाणी दिल्यास कमी पाण्यात अधिक उत्पादन काढणे शक्य होईल व ५० टक्के पाणी बचत करणे शक्य होईल.

सौ.के.एस.के.(काकू) कृषी महाविद्यालय, बीड

### आर्थिक मदत

राज्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ मध्ये क्यार व महा चक्रिवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे आणि अवेळी झालेल्या पावसामुळे राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३२५ तालुक्यांमधील शेतीपिकांचे व बहुवार्षिक पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या क्षेत्राचा आढावा घेतला. शेतीपिकासाठी प्रतिहेक्टर ८ हजार आणि फळबागासाठी १८ हजार असे प्रत्येक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेपर्यंतची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीतून सावरण्यासाठी २ हजार ५९ कोटी ३६ लाख ६५ हजार रूपयांची आर्थिक मदत शासनाने जाहीर केली आहे. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या भागाचे पंचनामे करण्यात आले आहेत यात शेती, फळपिकांच्या नुकसानीकरिता ३३ टक्के अथवा त्याहून अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यात येणार आहे. यात राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३२५ तालुक्यांचा समावेश आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मिळणारी मदतीची रक्कम शेतकऱ्यांच्या थेट बँक बचत खात्यात जमा करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट जमा झालेल्या या रक्कमेतून कोणत्याही बँकांनी कोणत्याही प्रकारची वसुली करू नये, असे आदेश संबंधित बँकांना देण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना थेट मदत होणार आहे. याशिवाय जमीन महसुलात सूट आणि शेतीपिकांच्या नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना शाळा व महाविद्यालयीन परीक्षा शुल्कही माफ करण्यात येणार आहे.



# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक – सन २०२०

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | जाहिरात | पूर्व परीक्षा दिनांक | पूर्व परीक्षेचा कालावधी | मुख्य परीक्षा दिनांक | मुख्य परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राज्य सेवा परीक्षा २०२० | डिसेंबर, २०१९ | ५.४.२०२० (रविवार) | १ दिवस | ८, ९ व १०.८.२०२० (शनिवार, रविवार व सोमवार) | ३ दिवस |
| २ | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा २०२० | जानेवारी, २०२० | १.३.२०२० (रविवार) | १ दिवस | १४.६.२०२० (रविवार) | १ दिवस |
| ३ | सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षा २०२० | जानेवारी, २०२० | १५.३.२०२० (रविवार) | १ दिवस | १२.७.२०२० (रविवार) | १ दिवस |
| ४ | **महाराष्ट्र दुय्यम सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२०** | फेब्रुवारी, २०२० | ३.५.२०२० (रविवार) | १ दिवस | --- | --- |
| | **४.१** महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा २०२० संयुक्त पेपर क्रमांक १ | ----- | | | ६.९.२०२० (रविवार) | १ दिवस |
| | **४.२** महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा २०२०- पेपर क्रमांक २ **पोलीस उप निरीक्षक** | | | | १३.९.२०२० (रविवार) | १ दिवस |
| | **४.३** महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा २०२०- पेपर क्रमांक २ **राज्य कर निरीक्षक** | | | | २७.९.२०२० (रविवार) | १ दिवस |
| | **४.४** महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा २०२०- पेपर क्रमांक २ **सहायक कक्ष अधिकारी** | | | | ४.१०.२०२० (रविवार) | १ दिवस |
| ५ | महाराष्ट्र वन सेवा परीक्षा २०२० | मार्च, २०२० | १०.५.२०२० (रविवार) | १ दिवस | ११.१०.२०२० (रविवार) | १ दिवस |
| ६ | **महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२०** | मार्च, २०२० | १७.५.२०२० | १ दिवस | --- | --- |
| | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२० | --- | --- | --- | १८.१०.२०२० (रविवार) | १ दिवस |
| ७ | **महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२०** | एप्रिल, २०२० | ७.६.२०२० (रविवार) | १ दिवस | --- | --- |
| | **७.१** महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२० संयुक्त पेपर क्रमांक १ | --- | --- | --- | २९.११.२०२० (रविवार) | १ दिवस |
| | **७.२** महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२०- पेपर क्रमांक २ **लिपिक-टंकलेखक** | ------ | | | ६.१२.२०२० (रविवार) | १ दिवस |
| | **७.३** महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२०- पेपर क्रमांक २ **दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क** | | | | १३.१२.२०२० (रविवार) | १ दिवस |
| | **७.४** महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा २०२०- पेपर क्रमांक २ **कर सहायक** | | | | २०.१२.२०२० (रविवार) | १ दिवस |
| ८ | महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा २०२० | मे, २०२० | ५.७.२०२० (रविवार) | १ दिवस | १.११.२०२० (रविवार) | १ दिवस |
| ९ | सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय परीक्षा २०२० | सप्टेंबर, २०२० | --- | --- | २८.११.२०२० | १ दिवस |




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मभूमी असलेल्या महू येथे भव्य स्मारक उभारण्यात आले आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्लीमधील २६, अलिपूर रोड येथील निवासस्थानी ऐतिहासिक स्मारक निर्माण करण्यात आले आहे.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month


# देशातील सर्वाधिक खपाचे मासिक




सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

अधिकृत आणि अचूक माहिती

‘एबीसी’ने उमटवली अधिकृत मोहोर

## लोकराज्य (मराठी)

## ६,२९,७९२

अन्नदाता (तेलुगू)
३,४३,३६६

वनिता (मल्याळम)
३,४०,९८०

गृहलक्ष्मी (हिंदी)
३,०४,२०३

मल्याळम मनोरमा (मल्याळम)
२,४१,१९३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR


प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह